POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२३८ ● मुंबई, सोमवार, ३१ मार्च २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## भारताची सर्वात मोठी संपत्ती आजचे तरुण, गरीब मुलंही आता डॉक्टर बनतील : पीएम मोदी

**■नागपूर | प्रतिनिधी :**

गुढीपाडवा आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नागपूरमध्ये माधव नेत्र रुग्णालयाची पायाभरणी केली. यावेळी त्यांनी जाहीर सभेच्य सुरुवातीला सर्वांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी विविध सण आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रवासाच्या १०० व्या वर्षाबद्दल देशवासियांना संबोधित केले. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले भाषण मराठीत सुरू केले. यासोबतच नवरात्रोत्सवाच्या प्रारंभाचा उल्लेख करत त्यांनी सर्व सणांच्या शुभेच्छा दिल्या आणि देशाच्या सांस्कृतिक विविधतेवर प्रकाश टाकला. याशिवाय, भगवान झुलेलाल आणि गुरु अंगद देव यांच्या जयंतीचा उल्लेख देखील केला.









**सर्व नागरिकांना चांगली आरोग्य सुविधा मिळावी**

भारताची सर्वात मोठी संपत्ती ही आजचे तरूण आहेत. भातातील तरुणांमध्ये आत्मविश्वास आहे. त्यामुळे हे तरुण २०४७ पर्यंत विकसित भारताच्या ध्येयाचा झेंडा हाती धरतील असं मोदी म्हणाले. देशातील सर्व नागरिकांना चांगल्या प्रकरची आरोग्य सुविधा मिळाली पाहिजे ही आमची प्राथमिकता आहे. तसेच देशातील सर्वात गरीब व्यक्तीलाही सर्वोत्तम उपचार मिळाले पाहिजेत. कोणताही नागरिक वंचित राहू नये. देशासाठी आपले जीवन अर्पण करणाऱ्या वृद्धांना उपचाराची चिंता नसावी हे धोरण सरकारचे आहे. त्यामुळेच आम्ही आज आयुष्यमान भारतमुळे कोट्यवधि लोकांना मोफत उपचारांची सुविधा देत आहोत.

**प्रत्येक ठिकाणी भारत सेवेसाठी प्रथम उभा राहतो**

पुढे मोदी म्हणाले की, जर आपण आपल्या देशाच्या इतिहासावर नजर टाकली तर आपण शेकडो वर्षे गुलामगिरीत जगलो. इतके हल्ले झाले. भारताची सामाजिक रचना नष्ट करण्याचे देखील अनेकदा प्रयत्न झाले. परंतु भारताची जाणीव कधीच संपली नाही. सर्वात कठीण काळातही आपल्या संतांनी भक्तीच्या कल्पनांनी आपल्या राष्ट्रीय चेतनेला नवीन ऊर्जा दिली. जगात कुठेही नैसर्गिक आपत्ती आली तरी भारत हा पूर्ण समर्पणाने सेवेसाठी उभा राहतो. म्यानमारमध्ये इतका मोठा भूकंप झाला आहे. ऑपरेशन ब्रह्माच्या माध्यमातून भारत तिथल्या लोकांना मदत करण्यासाठी सर्वात आधी पोहोचला. जेव्हा नेपाळमध्ये भूकंप झाला. मालदीवमध्ये पाण्याचे संकट आले, तेव्हा देखील सर्वात प्रथम भारताने मदत केली असं मोदी म्हणाले.



### पीएम नरेंद्र मोदींचा नागपूर दौरा
### ८ वर्षांनी दीक्षाभूमीला दिली भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवार 30 मार्च रोजी नागपूर दौऱ्यावर आहेत. सकाळपासून मोदींचा नागपूर दौरा सुरु झाला असून ते दिवसभरात विविध ठिकाणांना भेट देणार आहेत. रविवारी मोदींच स्वागत करण्यासाठी राज्यपाल सी. पी राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यासह पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती होती. नागपूर दौऱ्यावर आलेल्या पंतप्रधानांनी ८ वर्षांनी दीक्षाभूमीला भेट दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी सकाळी नागपूर येथील दीक्षाभूमी स्थळी दाखल झाले आणि यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला भेट दिली. दीक्षाभूमी स्मारकाच्या आतमध्ये असलेल्या गौतम बुद्ध यांच्या मूतीर्ला मोदींनी अभिवादन केले. तसेच दीक्षाभूमीच्या पवित्र स्तूपांमध्ये बुद्ध वंदना केली. यापूर्वी २०१७ रोजी नरेंद्र मोदी नागपूरच्या दीक्षाभूमीला आले होते. १४ एप्रिल २०१७ रोजी त्यांनी दीक्षाभूमीला भेट दिली होती त्यानंतर आठ वषार्नंतर मोदीजी दीक्षाभूमीवर आले.

## बीडला पुन्हा हादरा... ईदआधी मशिदीत स्फोट

**■मुंबई | प्रतिनिधी :**

बीडच्या गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावातील मशिदीमध्ये स्फोट झाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. अज्ञात माथेफिरू फरारबीडच्या गेवराई तालुक्यातील अर्धा मसला गावात एका मशिदे मध्ये स्फोट करण्यात आला. या घटनेने संपूर्ण बीड हादरलं आहे.

रमझान ईदच्या काही तासापूर्वी बीडमधील अर्धामसला गावातील मशिदीत पहाटेच्या सुमारास स्फोट झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.पोलिसांनी या प्रकरणात तातडीने तपासाला सुरुवात केली आहे. घटनास्थळी पोलीस दलाचे बॉम्ब शोधक पथक आणि फॉरेन्सिक टीमही दाखल झाली आहे. या दरम्यान, पोलिसांनी स्फोट प्रकरणात दोन तरुणांना ताब्यात घेतले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा हा विविध कारणांनी चर्चेत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील वातावरण ढवळून निघाले. या प्रकरणनंतर बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला. त्यातच रमजान ईदच्या काही तास आधीच मशिदीत स्फोट झाल्याने एकच खळबळ उडाली.



यात मशीदी मधील फरशी आणि बांधकामाला तडे गेले आहेत. अज्ञात माथेफिरूने हे कृत्य केलं असून पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत घटनास्थळी दाखल आहेत. मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास माथे फिरूने हे कृत्य केलं आहे. यामागील कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिसांनी शांततेचे आवाहन केले आहे. तर पोलीस अज्ञात व्यक्तीचा शोध घेत आहेत.

बीडच्या अर्धामसला गावातील मशिदीत झालेल्या स्फोटाच्या घटनेचे गांभीर्य ओळखत विशेष पोलिस महानिरीक्षक संभाजी नगर परिक्षेत्र वीरेंद्र मिश्र यांनी घटनास्थळी भेट दिली. तर पोलीस अधीक्षक नवनीत कावत सकाळपासून घटनास्थळी ठाण मांडून आहेत. तलवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## एप्रिल महिना नेमका कसा? कोकणात यलो अलर्ट
## तर काही भागात विजांसह पावसाची शक्यता



**■मुंबई | प्रतिनिधी :**

कोकणात पावसाची शक्यता असून चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. पावसाच्या इशाऱ्यानंतर मासेमारी करणाऱ्या बोटी किनाऱ्यावर आणण्यात आल्या आहेत. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळपासून महाराष्ट्रापर्यंत कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्यामुळे हवामान बदलत आहे. कोकणात अवकाळी पावसामुळे आंबा आणि काजू बागायतदार चिंतेत आहेत. गेल्या चार-पाच दिवसांत कोकणातील काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडला आहे. या पावसामुळे आंबा आणि काजू उत्पादकांसाठी समस्या निर्माण झाल्या आहेत. हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यामुळे समुद्रातील बोटींनाही सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. बोटी समुद्रातून परत आल्या आहेत. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळपासून महाराष्ट्रापर्यंत कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्यामुळे हवामान बदलत आहे. महाराष्ट्रात गुढीपाडव्यानंतर एप्रिल महिना सुरु होईल. यापासूनच अवकाळी पावसाची सुरुवात होईल. महाराष्ट्रात एप्रिलपासून विचित्र वातावरण असेल. कडक उन्हाळा आणि अवकाळी पाऊस यामुळे वातावरणावर खूप परिणाम होईल. यामुळे नागरिकांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

### हवामान खात्याने काय म्हटले?

हवामान विभागाचे तज्ज्ञ सुप्रीत कुमार यांच्या मते, पुढील दोन दिवसांत तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात दोन ठिकाणी ४२ ते ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. विदर्भ आणि मराठवाड्यात ४० ते ४२ अंशांच्या दरम्यान तापमानाची नोंद झाली. कोकण भागात दिवसा उष्ण हवामान असते आणि संध्याकाळी पाऊस पडतो. जोरदार वाऱ्यांमुळे, मिरकरवाडा, राजीववाडा, मिर्या, साखरतर, जाकादेवी, कासारवेली, जयगड, नाटे आणि हर्णे येथील बहुतेक बोटी किनाऱ्यावर आल्या आहेत.

### विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

कर्नाटक समुद्राकडे सरकणाऱ्या चक्रीवादळामुळे, ३० मार्च रोजी कोकण किनाऱ्यावर विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या इशाऱ्यामुळे आंबा उत्पादक चिंतेत पडले आहेत आणि मच्छिमारांनी त्यांच्या बोटी किनाऱ्यावर उभ्या केल्या आहेत. पुढील दोन दिवस दिवसाचे तापमान २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढू शकते. रात्रीच्या वेळी तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे.

### या भागात उच्च तापमान

यानंतर तीन दिवस कोणताही बदल होणार नाही. पण मे महिन्यात आधीच खूप उष्णता असते. अवकाळी पाऊस आणि उष्णतेमुळे परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे. नागपूर, ब्रह्मपुरी, अकोला, वर्धा आणि अमरावती येथे सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. अनेक भागात तापमान ४२ अंशांपेक्षा जास्त झाले.

### सीसीटिव्ही निगराणीत होते मोजणी

मंदिरातील सर्व सिंहासन पेट्या व दानपेट्यांची सोमवार, बुधवार व शुक्रवार अशी आठवड्यातून ३ वेळा धमार्दाय आयुक्त कार्यालयाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत व सीसीटीव्हीच्या निगराणीत मोजणी केली जाते. यासाठी मंदिर कर्मचाऱ्यांची तीन पथके आहेत. दरम्यान मंदिर संस्थांना याबाबत संपर्क केला असता भाविक गुप्तदान पद्धतीने दानपेटीत दान टाकत असतात. त्यामुळे हे दान कोणी टाकले याची माहिती आम्ही घेतली असून ती गुप्त ठेवण्यात येणार असल्याचं मंदिर संस्थांनाने सांगितलं आहे.

## तुळजाभवानीच्या चरणी अज्ञात भाविकाकडून १ कोटींचे दान, १०० ग्रॅमची ११ बिस्किट

**■मुंबई | प्रतिनिधी :**

तुळजा भवानी देवीच्या चरणी लाखो लोक दर्शनाला येत असतात. तुळजाभवानी महाराष्ट्राची कुलदेवी आहे. महाराष्ट्राबरोबरच दक्षिणेकडील भक्तदेखील देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरला येत असतात. भक्त देवीच्या चरणी भरभरून दान करत असतात. देवीच्या चरणी एका अज्ञात भक्ताने तब्बल १ कोटी रुपयांचे दान अर्पण केले आहे. तुळजाभवानीला १ किलो सोन्याच्या ११ बिस्किटांचे गुप्तदान करण्यात आले असून प्रत्येक बिस्किट १०० ग्रॅमचे आहे. मंदिरातील दानपेट्या उघडल्यावर हा प्रकार उघडकीस आला आहे.





महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानी देवीच्या दानपेटीत एका अज्ञात भाविकाने १ किलो १०० ग्रॅम वजनाची २४ कॅरेट सोन्याची ११ बिस्किटे अर्पण केली आहेत. प्रत्येक बिस्किटाचे वजन १०० ग्रॅम आहे. शुक्रवारी सकाळी दानपेट्या उघडण्यात आल्या तेव्हा भाविकाने अर्पण केलेले सोन्याचे बिस्किट चोपदार दरवाजातील सिंहासन पेटी क्र.२ मध्ये आढळून आली. प्रत्येक बिस्किटावर १०० ग्रॅम तसेच ९९९ लिहिले आहे. शुक्रवारी सोन्याचा प्रतितोळा दर ९२ हजार रुपये होता. त्यानुसार या ११ बिस्किटाची किंमत सुमारे १ कोटी १ लाख २० हजार रुपये होते.

तुळजाभवानीच्या मुख्य गाभाऱ्यासह शिखराची पुनर्बांधणी होणार आहे. देवीच्या मुख्य मंदिराची नव्याने बांधणी होत असून पुरातत्त्व विभागाच्या स्ट्रक्चरल रिपोर्टनंतर बदलण्यात आला निर्णय. सुमारे दीडशे वषार्नंतर तुळजाभवानीच्या मुख्य गाभारा आणि शिखराचे नव्याने निर्माण होत आहे. श्री तुळजाभवानीची मूर्ती इतर ठिकाणी हलवून करण्यात येणार मुख्य शिखराचे काम. मुख्य मंदिर सोडून दोन वर्ष देवीची मूर्ती राहणार दुसऱ्या ठिकाणी राहणार आहे.

## दारुच्या नशेत बायकोचा ओढणीने गळा आवळून खून, हात-पाय तोडून मृतदेह इलेक्ट्रिक पंपाच्या बॉक्समध्ये कोंबला

**■सांगली | प्रतिनिधी :**

शिराळा तालुक्यातील मांगले येथे पतीने दारुच्या नशेत पत्नीचा गळा आवळून खून केल्याची घटना घडली आहे. हत्या केल्यानंतर नवऱ्याने बायकोचा मृदेह विद्युत पंपाच्या पेटीत कोंबून ठेवला होता. काही दिवसांपूर्वी मेरठमध्ये एका पत्नीने प्रियकराच्या साथीने आपल्या नवऱ्याचा खून करुन त्याला मृतदेह प्लॅस्टिकच्या ड्रममध्ये टाकून त्यावर सिमेंट टाकल्याचा प्रकार समोर आला होता. या घटनेची देशभरात चर्चा असताना आता सांगलीच्या शिराळ्यात अंगावर शहारे आणणारी ही घटना समोर आली आहे.

प्राजक्ता मंगेश कांबळे (वय २८) असे खून झालेल्या महिलेचे नाव असून मंगेश चंद्रकांत कांबळे असे संशयित आरोपी पतीचे नाव आहे. खून केल्यानंतर मंगेश कांबळे स्वतःहून पोलिसांसमोर हजर झाला. मंगेशचा भाऊ निलेश आणि त्याची आई गेल्या पंधरा वषार्पासून मांगले येथे वास्तव्यास आहे. मांगले - वारणानगर रस्त्यावर जोतीबा मंदिराच्या समोर रामचंद्र वाघ यांच्या कौलारू घरात ते भाड्याने राहत आहेत. चार दिवसांपूर्वी मंगेश, त्याची पत्नी प्राजक्ता व सहा वर्षाचा मुलगा शिवम तीन वषार्ची मुलगी शिवन्या मुंबईहून आई आणि भावाकडे रहायला आले होते. गेल्या चार दिवसांपासून एकत्र राहणारे मंगेश आणि प्राजक्ता आज सकाळी भाऊ निलेश आणि आई देववाडी येथे एका कार्यक्रमासाठी गेले होते . निलेश व प्राजक्तामध्ये वाद झाला. वाद विकोपाला जाऊन मंगेशने प्राजक्ताचा ओढणीने गळा आवळून खून केला.



शिवमने सांगितलेला प्रकार ऐकून निलेशने त्याचा भावाल फोन करुन कुठे आहेस विचारले. यावर मंगेशने मी गोरक्षनाथ मंदिराजवळ असल्याचे सांगितले. यानंतर निलेशने देववाडी येथे असणाऱ्या त्याच्या बहिणीली आणि तिच्या पतीला मांगले येथे बोलावून घेतले. ते दोघे आल्यानंतर निलेशने मंगेशला पुन्हा फोन केला. तेव्हादेखील मंगेश हा गोरक्षनाथ मंदिराजवळच होता. तेव्हा या तिघांनी तिकडे जाऊन मंगेशला झालेल्या प्रकाराबद्दल विचारणा केली. मंगेशने आपण प्राजक्ताचा खून केल्याची कबुली दिली. तेव्हा या तिघांनीही मंगेशला पोलिसांसममोर आत्मसमर्पण करायला सांगितले. त्यानंतर आरोपी मंगेश कांबेळे स्वतः शिराळा पोलिसांत हजर झाला.

### मृतदेह इलेक्ट्रिक पंपाच्या पेटीत कोंबला

मंगेश कांबळे याने प्राजक्ताला ठार मारल्यानंतर तिचा मृतदेह बाजूच्या खोलीत घर मालकाने ठेवलेल्या विद्युत पंपाच्या मोडक्या पेटीत हातपाय मोडून झाकून ठेवला. त्यानंतर मंगेशने खोलीला बाहेरून कुलूप लावले. मंगेशने त्याचा भाऊ निलेशला फोन करुन मी शिराळ्याला जाणार असल्याचे सांगितले. गाडी घेऊन ये, असा निरोप भावाला दिला. त्यानंतर मंगेशचा भाऊ निलेश देववाडीतून मांगले गावात आल्यानंतर मंगेशने भावाकडून गाडी घेऊन तो शिराळ्याकडे निघून गेला. यादरम्यान मंगेशचा सहा वर्षाचा मुलगा शिवम दारातच रडत होता. त्यावेळी निलेशने त्याची विचारपूस केली. तेव्हा सहा वर्षाच्या शिवमने मम्मी-पप्पांचे दोघांचे भांडण होऊन पप्पांनी आईला मारून खोलीत ठेवल्याचे सांगितले .

## दहावीच्या विद्यार्थिनीला अश्लील व्हिडीओ पाठवला?
## मुख्याध्यापकाने स्वतःला संपवलं

**■नागपूर | प्रतिनिधी :**

नांदेड जिल्ह्यामध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका शाळेतील मुख्याध्यापकाने दहाव्या इयत्तेत शिकणाऱ्या मुलीला अश्लील व्हिडीओ पाठवला. हे प्रकरण थेट पोलीस स्टेशनपर्यंत गेलं. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर या मुख्यध्यापकाने आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. आत्महत्येपूर्वी शिक्षकाने चिठ्ठी देखील लिहिलेली आहे.

**कोणती शाळा आणि मुख्याध्यापक कोण?**

मिळालेल्या माहितीनुसार नांदेड शहराजवळ असलेल्या पासदगाव येथे पुष्पांजली माध्यमिक शाळा आहे. या शाळेचे मुख्याध्यापक सुनील कारामुंगे यांनी त्यांच्याच शाळेत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीला अश्लील व्हिडीओ पाठवले होते. पीडित मुलीच्या कुटुंबीयांना याबाबत समजलं तेव्हा त्यांनी मुख्याध्यापक कारामुंगेंविरोधात पोलीसात तक्रार दाखल केली. शिवाजीनगर पोलिसांनी गुरुवारी सुनील कारामुंगेविरोधात पोकसोअंतर्गत गुन्हा दाखल केला.



**आत्महत्येच्या चिठ्ठीत काय लिहिलं आहे?**

गुन्हा दाखल झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी मुख्याध्यापक सुनिल कारामुंगे यांनी विष प्राशन केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला. आत्महत्येपूर्वी सुनील कारामुंगे यांनी चिठ्ठी लिहीली आहे. ही चिठ्ठी पोलीसांनी जप्त केली आहे. ''पीडित मुलीच्या कुटुंबीयानी माझा मानसिक छळ केला त्यामुळे आत्महत्या करत आहे,'' असा उल्लेख या चिठ्ठीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मात्र आत्महत्येपूर्वी मुध्याध्यापकांनी लिहिलेल्या या चिठ्ठीतील हस्ताक्षर त्यांचेच आहे ना याची पडताळणी पोलिसांकडून सुरु आहे, अशी माहिती शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शिवाजी गुरमे यांनी दिली आहे.

### मुख्याध्यापकाच्या कुटुंबियांनीही दाखल केली तक्रार

दरम्यान, मयत मुख्याध्यापक सुनील कारामुंगे यांच्या कुटुंबीयांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात पीडित मुलगी आणि तिच्या नातेवाईकाविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याची तक्रार नोंदवली असून. या प्रकरणी रात्री उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## १५ दिवस उपाशी ठेवलं, हात-पाय पिरगळून तोडले... दत्तक घेतलेल्या चिमुकलीला निर्दयी जोडप्याने संपवलं

**■छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :**

गेल्या काही देशभरातून गुन्हेगारी आणि खुनाच्या मन हेलावून टाकणाऱ्या कहाण्या समोर असताना छत्रपती संभाजीनगरच्या सिल्लोड तालुक्यात काळजाचं पाणी करणारी घटना समोर आली आहे. सिल्लोड तालुक्यातील मुगलपुरा परिसरात एका चार वर्षांच्या मुलीची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. एका जोडप्याने या मुलीला काही दिवसांपूर्वी दत्तक घेतले होते. मात्र, त्यांनीच या चिमुरड्या मुलीला अक्षरशः हालहाल करुन संपवले. या घटनेमुळे सिल्लोड तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, मुगलपुरा परिसरात हत्या झालेल्या मुलीचे नाव आयत फईम शेख असे आहे. फईम आणि फौजिया फईम शेख आयुब या पती-पत्नीला पोलिसांनी याप्रकरणात अटक केली आहे. फईम आणि फौजिया यांना चार मुलं होती. त्यांनी सहा महिन्यांपूर्वी जालन्यातून ५ हजार रुपये देऊन आयत हिला विकत घेतले होते. मात्र, तिला घरी आणल्यानंतर या दोघांनी आयत हिच्यावर अनन्वित अत्याचार केले. अवघ्या ४ वर्षांच्या या चिमुकलीला गेल्या १५ दिवसांपासून उपाशी ठेवण्यात आले होते. फईम आणि फौजिया आयतला बेदम मारहाण करत होते. या दोघांनी चिमुरडीच्या अंगावर अनेक ठिकाणी जळत्या लाकडाने चटके दिले होते. तसेच फईम आणि फौजियाने चिमुरडीचे हात आणि पाय पिरगळून तोडले होते. तळहात आणि पायाच्या तळव्याच्या जॉईंटमधून तिची हाडे पिरगळून तोडण्यात आली होती. तिच्या डोक्यात आणि पाठीत जोरजोरात मारून तिला गंभीर जखमी करण्यात आले होते. या अमानुष मारहाणीमुळे चिमुरडी आयत व्हिवळत होती. या अनन्वित अत्याचारामुळे गोंडस दिसणाऱ्या आयतचा चेहरा अक्षरशः काळवंडला होता. अखेर या मारहाणीमुळे बुधवारी रात्री आयत शेख हिने प्राण सोडले होते. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर फईम आणि फौजिया शेख यांनी याचा पत्ता कोणालाही लागू नये, यासाठी परस्पर तिचे अंत्यसंस्कार उरकण्याचा प्रयत्न केला. चिमुरडीचा मृत्यू झाल्यानंतर फईम आणि फौजिया शेख यांनी तिचा मृतदेह सिल्लोड येथील एका कब्रिस्तानात नेला. याठिकाणी ते परस्पर आयतचा दफनविधी करुन पुरावे नष्ट करण्याच त्यांचा प्रयत्न होता. मात्र, आजुबाजूच्या लोकांना हा सगळा प्रकार लक्षात आला. त्यावेळी लोकांनी सिल्लोड पोलिसांना याबद्दल माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी कब्रिस्तानाचा जाऊन हा दफनविधी रोखला. पोलिसांनी आयत शेख हिचा मृतदेह ताब्यात घेऊन तो सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. तेव्हा या चिमुरडीला हालहाल करुन मारण्यात आल्याची बाब उघड झाली. या घटनेमुळे सिल्लोड तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सिल्लोड शहर पोलिसांनी दोघा फौजिया आणि फईम शेख यांना अटक करून त्यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला.





## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# महाराष्ट्रातील महाउकिरडे

हजारो टन कचऱ्याने महाराष्ट्रातील बहुतांश शहरांना घातलेल्या विळख्यावरून महालेखापालांनी (कॅग) राज्य सरकार आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे कान टोचले आहेत. सर्वाधिक वेगाने विकास होणाऱ्या आणि एकूण देशांतर्गत उत्पन्नात (जीडीपी) सर्वाधिक वाटा असलेल्या या राज्यातील यंत्रणा मूलभूत समस्या सोडविण्याबाबत उदासीन असल्याचे आणि लाखो नागरिकांच्या वाट्याला दुर्गंधी-अनारोग्याचे जिणे येत असल्याचे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले. सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ या सहा वर्षांत राज्यभरात तब्बल ३४ लाख टन कचरा उघड्यावरच टाकला गेला आहे. विविध स्थानिक स्वराज्य संस्थांचे कचरा निर्मूलन धोरण आणि त्याची अंमलबजावणी यांचे पितळ या अहवालाने उघडे पाडले. १३ स्थानिक स्वराज्य संस्थांनी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कॅपिंग किंवा बायोमायनिंगसारख्या शास्त्रशुद्ध उपाययोजना केलेल्या नाहीत. २३ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओल्या-सुक्या कचऱ्याच्या वर्गीकरणाचे शंभर टक्क्यांचे उद्दिष्ट गाठण्यात आलेले नाही, तर एका शहरात या कचऱ्याचे अजिबात वर्गीकरणच होत नसल्याचे समोर आले आहे. राज्यातील ४१ टक्के कचरा मुळी संकलितच होत नाही, बांधकामांतून निघणारा ९८ टक्के राडारोडा कोणत्याही प्रक्रियेविना उघड्यावर फेकला जातो; तर २६ शहरांमधून कचरा टाकण्यासाठी शास्त्रशुद्ध व्यवस्थाही नाही, अशा ताशेऱ्यांनी यंत्रणांपुढे आरसा धरला आहे. कचरा निर्मूलनाचे सर्वंकष नियोजन करावे, प्रकल्पांचा अहवाल तयार करावा, नागरिकांकडून शुल्कआकारणी करावी, या 'कॅग'च्या सूचना सरकार गांभीयार्ने घेणार का, हा प्रश्न आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या आणि देशातील काही राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या बृहन्मुंबई महापालिकेचाही समावेश आहे. मुंबईत अत्यंत घातक असा वैद्यकीय कचरा हा अन्य कचऱ्यातच मिसळला जात असल्याची धक्कादायक बाब अघड झाली आहे. देवनारसोबत नव्याने कांजूरमार्ग येथे रोज सुमारे पाच हजार टन कचरा टाकला जाणाऱ्या जागेवरील अव्यवस्थेमुळे हैराण झालेल्या नागरिकांनी मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली आहे. दुसरीकडे कचरा-अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी नियुक्त केलेले अनेक 'क्लीनअप मार्शल' कारवाईच्या नावाखाली नागरिकांची लूट करीत असल्याचे उघडकीला आले. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी ही व्यवस्थाच थांबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतल्याने समस्येत भरच पडते आहे. कचऱ्यापासून वीजनिर्मितीच्या प्रकल्पाला लालफीतशाहीच्या विलंबाचा शाप लागला आहे. राज्यातील अन्य शहरांमध्ये कमी-अधिक प्रमाणात हीच स्थिती आहे. 'कचऱ्याचे ढीग दिसू लागले की गाव आले, असे समजावे,' ही स्थिती तेथील कारभाराचे निदर्शक आहे. कचऱ्यामुळे माती, पाणी आणि हवा प्रदूषणाने आरोग्य व पर्यावरणाचे भीषण प्रश्न उभे राहिले आहेत. राज्यातच नव्हे; तर देशातही कचऱ्याच्या समस्येवर परिणामकारक- शाश्वत असा उपाय यंत्रणांना अद्याप सापडलेला नाही. कचऱ्यापासून वीजनिर्मिती- खतनिर्मिती करणारे प्रकल्प एक तर अयशस्वी ठरले किंवा पूर्ण क्षमतेने चालत नाहीत. कचरा साठविण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धत नाही. कचऱ्यातून भ्रष्टाचाराचे कुरण शोधणारी मोठी साखळी असून बड्या धेंडांच्या हितसंबंधांमध्ये अनेक शहरे अडकली आहेत. तंत्रज्ञानातील प्रगतीचा लाभ घेण्यासाठी या स्थानिक स्वराज्य संस्था आणि येथील नागरिकांनीही काही पथ्ये पाळणे, ही या उत्तराची पहिली पायरी ठरते. घरोघरी ओल्या-सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण, हा मूलभूत उपाय आहे. त्यातूनच या कचऱ्यावर पुढील प्रक्रिया शक्य होणार आहे. त्यासाठी लोकप्रतिनिधींनीही जागृती आणि प्रसंगी दंड आकारणीतून नागरिकांना शिस्त लावली पाहिजे. गेल्या काही वर्षांत राज्यातील लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढली; पण त्या वेगाने नागरी सुविधा पुरविणे, ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवाक्याबाहेरील बाब ठरली आहे. त्यामुळे तेथील रस्ते, पाणीपुरवठा-सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन हे प्रश्न उग्र बनले आहेत. मुंबईसारखी मोठी शहरे सोडली, तर कचरा निर्मूलनासाठी प्रचंड भांडवली गुंतवणुकीचे प्रकल्प उभारण्याची आर्थिक ताकद बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नाही; त्यामुळे तेथे खासगी कंपन्या-कंत्राटदारांचा शिरकाव होतो आणि हितसंबंधांमुळे नवेच प्रश्न उभे राहतात. देशभरातील स्थलांतरितांचे ओझे वाहणाऱ्या या शहरांच्या कचरा प्रश्नावर राज्यव्यापी धोरण आखणे आणि मूलभूत समस्या सोडविण्यासाठी 'स्मार्ट सिटी'सारख्या उथळ योजनांऐवजी ठोस आर्थिक बळ देणे, ही केंद्र व राज्य सरकारचीही जबाबदारी आहे. ती त्यांनी पार पाडावी.

**कधीकाळी सुजलाम–सुफलाम असणाऱ्या या राज्याच्या ललाटावर गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी आत्महत्यांची जखम भळभळत आहे. सभागृहात आणि बाहेर सतत बोलतच असणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या कानांवर हा आक्रोश पडत नाही का?**

आर्थिक कंबरडे मोडलेल्या महाराष्ट्राने नव्या आर्थिक वर्षात पदार्पण केले आहे. २०२० मध्ये भारत महासत्ता होणार हे स्वप्न डोळ्यांत घेऊन शिक्षण घेणाऱ्या तरुणांच्या वाट्याला आज २०२४-२५ मध्ये बेरोजगारीचे क्रूर वास्तव आले आहे. बांधावर किंवा बाजार समितीत आपला शेतमाल नगदी विकला जाईल, शेतीमालाला रास्त भाव मिळेल, आर्थिक स्थिती सुधारेल, हे शेतकऱ्यांचे स्वप्न डोळ्यांतल्या अश्रूंनी वाहून गेले आहे. निवडणुकांच्या वेळी आश्वासनांचा पाऊस पडतो, शेतकऱ्यांसह सर्व लोक सुखाची स्वप्ने पाहतात. मग सत्तांतर होते, आश्वासने विसरली जातात. शेतकरी, कष्टकरी, बेरोजगारांच्या स्वप्न पाहणाऱ्या डोळ्यांत अश्रू कायमच राहतात.

सुखी आणि संपन्न राज्याचे स्वप्न पाहणाऱ्या शेतकऱ्यांच्या वाट्याला हालाखीचे आणि उपेक्षेचे दिवस आले आहेत. लाडक्या बहिणी, लाडक्या लेकी असुरक्षित आहेत. लाडके भाऊ बेरोजगार आहेत. प्रगत हे बिरूद असणाऱ्या महाराष्ट्रावर कर्जाचा बोजा सतत वाढत आहे. गेल्या पाच वर्षांतील महाराष्ट्रावरील कर्जाची आकडेवारी सुजाण नागरिकांची चिंता वाढवणारी आहे. २०२०-२१ या आर्थिक वर्षात ५ लाख १९ हजार कोटींचे कर्ज २०२१-२२ मध्ये ५ लाख ७६ हजार कोटींवर गेले तर २०२२-२३ मध्ये आणखी वाढ होऊन कर्ज ६ लाख २९ हजार कोटी झाले.

२०२३-२४ या आर्थिक वर्षात कर्जाचा आकडा ७ लाख ११ हजार कोटींवर गेला तर २०२४-२५ मध्ये ८ लाख ३९ हजार कोटी रुपये कर्ज या राज्यावर आहे. आता २०२५-२६ या आर्थिक वर्षात कर्जाचा बोजा ९ लाख ३२ हजार कोटींवर जाईल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. जर महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी २३ लाख एवढी असेल तर २०२५ -२६ या आर्थिक वर्षात या राज्यातील प्रत्येकावर ८२ हजार ९५८ रुपये कजार्चा बोजा असेल. आज महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीवर सरासरी सुमारे ६३ हजार रुपयांचे कर्ज असल्याचे सांगितले जाते. २००१ ते २०२४ या २४ वर्षांत या राज्यात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. १९ मार्च १९८६ रोजी विदर्भातील साहेबराव करपे आणि मालतीबाई करपे या शेतकरी नवरा बायकोने आपल्या तीन मुलांसह आत्महत्या केल्याच्या घटनेला आता ३९ वर्षे झाली. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगावराजा तालुक्यातील राज्य पुरस्कार प्राप्त युवा शेतकरी कैलास अर्जुन नागरे यांनी आत्महत्या केल्याची घटना १३ मार्चच्या सकाळी महाराष्ट्रासह साऱ्या देशाला कळली. शेतकऱ्यांचे अश्रू चाळीस वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

कधीकाळी सुजलाम-सुफलाम असणाऱ्या या राज्याच्या ललाटावर गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी आत्महत्यांची जखम भळभळत आहे.गेल्या ६५ वर्षांत महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक आंदोलने झाली, चळवळी झाल्या. शेतकरी कामगार पक्ष १९४८ पासून शेतकऱ्यांच्या संदर्भात कार्य करत आहे. १९८० च्या दशकात महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्येही शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सक्रियपणे कार्य करणारी शरद जोशी यांची शेतकरी संघटना, १९६२ पासून बाबा आढाव यांच्या नेतृत्वात सुरू झालेली धरणग्रस्तांची चळवळ, १९८७-८८ पासून सुरू झालेले नर्मदा बचाव आंदोलन, 'आधी पुनर्वसन मग धरण' हा विचार घेऊन शेतकऱ्यांचे संघटन, राळेगणसिद्धी, हिरवे बाजार आणि लेखामेंढा या गावांतील अपूर्व प्रयोग या आणि अशा कितीतरी चळवळी, आंदोलन, गावपातळीवरच्या संघटनशक्तीने घडवून आणलेले गावाचे विधायक रूप यांमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भातील सामाजिक चळवळींची जागरूकता साऱ्या देशात लक्षणीय ठरली.

दुसऱ्या बाजूने 'कसेल त्याची जमीन' हा कायदा, सहकारी साखर कारखान्यांची उभारणी, ग्रामीण रोजगार हमी योजना, जलसंधारण, हरितक्रांतीचे प्रयत्न, कापूस एकाधिकारयोजना अशा काही महत्त्वाकांक्षी योजना राजकारण्यांनी प्रत्यक्षात उतरविल्या. यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींची आणि राजकारण्यांची इच्छाशक्ती शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांच्या समस्या मिटविण्याची आहे, असे काहीसे चित्र महाराष्ट्रात निश्चितच निर्माण झाले होते. पण, १९९० नंतर महाराष्ट्राचे सारे चित्रच बदलले. सहकार क्षेत्राचे स्वाहाकारात रूपांतर झाले. रोजगार हमी योजना, जलसंधारणाची कामे सारी गैरव्यवहाराची कुरणे झाली. हरितक्रांतीचे स्वप्न भंगले, कापूस एकाधिकार योजना अपयशी ठरली, शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत जागरूक असणारे पक्ष, संघटना, चळवळी यांना फुटीचे ग्रहण लागले. शेतकरी संघटना अक्षरशः कोलमडून पडली. शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या बिगर राजकीय संघटना अनेक राजकीय पक्षांच्या गळाला लागल्या. शेतकऱ्यांना ताठ कण्याने उभे राहण्यास शिकवणारी शेतकरी संघटना मनाने, धनाने आणि कण्याने मोडून पडली. आजघडीला एखाद-दुसरा अपवाद सोडला तर महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे, गावकऱ्यांचे संघटन केवळ नाममात्र उरले आहे. हे अप्रिय असले तरी सत्य आहे. राजकीय आणि सामाजिक पातळीवर आता शेतकऱ्यांचा कोणी वाली उरला नाही. या देशातील आणि राज्यातील शेतकरी अगदी प्राचीन काळापासून कधीच सुखी नव्हता आणि आजही सुखी नाही. प्राचीन काळापासून आजतागायत पिढ्यानपिढ्या मातीत आयुष्य पेरणाऱ्या शेतकऱ्यांनी नीतिमत्ता पाळत आणि सामुदायिक सदाचाराचा विचार निष्ठेने आचरणात आणला. शेतकऱ्यांचे नैतिक अधःपतन कधी झाले नाही हे जसे खरे आहे तसेच हेदेखील खरे आहे की प्राचीन काळापासून आजतागायत शेतकऱ्यांना कधी न्याय मिळाला नाही.

या राज्यात कर्जमाफीच्या हातांनी शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचे काही प्रयत्न झाल्याचे दिसते. ६५वर्षांचे वय गाठू पाहणाऱ्या महाराष्ट्रात आजतागायत अनेक वेळा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी प्रयत्न केल्याचे दिसते. आपल्या १८ महिन्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी सात लाख ८० हजार शेतकऱ्यांचे सुमारे ५० कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते. त्यानंतर २००८ मध्ये आणि पुढे २०१८ मध्ये वेगवेगळ्या स्वरूपात कर्जमाफी करण्यात आली. याशिवाय वेळोवेळी अनेक उपाययोजना करण्यात आल्या पण शेतकऱ्यांच्या समस्या संपल्या नाहीत. आत्महत्या सुरूच आहेत. विविध वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांनी वेळोवेळी दिलेल्या माहितीनुसार २००८ ते २०१८ या काळात महाराष्ट्रात २३ हजार ६३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ही आकडेवारी शासनदरबारी नोंद झालेल्या आत्महत्यांची आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या यापेक्षाही मोठी असू शकेल. महाराष्ट्रासारखीच परिस्थिती थोड्याफार फरकाने अनेक राज्यांतही असू शकते. या देशातला शेतकरी त्रस्त आहे, जगण्याची उमेद हरवून बसलेला आहे. शासन आणि समाज आपल्या पाठीशी नाही असेच या देशातील शेतकऱ्याला सतत वाटत आलेले आहे. २०१४मध्ये या देशात १२ हजार ३६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. २०१५ मध्ये १२ हजार ६०२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तर २०१६ मध्ये ११ हजार ३६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद सरकारने घेतली आहे. या आकडेवारीचा सरळ अर्थ असा आहे की सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले नाही. २०१६ यावर्षी भारतात दर महिन्यात सुमारे ९४८ शेतकरी आत्महत्या झाल्या. महाराष्ट्राचा विचार केला तर २०१८ मध्ये महाराष्ट्रात दर महिन्याला २३१ शेतकरी आत्महत्या झाल्या. २०१९यावर्षी एकट्या विदर्भात दर महिन्याला सुमारे ८३ ते ८५ शेतकरी आत्महत्या घडत होत्या. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची २०२४ ची आकडेवारी अंगावर काटा आणणारी आहे.

१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या वर्षभरात अमरावती विभागात १०६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात ९५२ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे. एकट्या बीड जिल्ह्यात मागील वर्षी २०५ तर अमरावती जिल्ह्यात २०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. अकोला जिल्ह्यात १६८, वर्धा जिल्ह्यात ११२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. डिसेंबर महिन्यात सत्तेवर आलेल्या नव्या सरकारला गेल्या चार महिन्यांपासून शेतकऱ्यांचे प्रश्न महत्त्वाचे वाटले नाहीत का? या शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे कृतिशील उत्तर दिले जाईल का? खरेतर कर्जमाफी ही तात्पुरती उपाययोजना असते, पण ती करावीच लागते. शेतकऱ्याला चिंतामुक्त करण्याचा प्रश्न कठीण आहे आणि गंभीरही. कर्जमाफीने शेतकऱ्याला चिंतामुक्त करण्याचा प्रश्न सुटेल असेही नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे म्हणजे त्यांना आर्थिक पातळीवर नवी सुरुवात करण्याची संधी देणे. शेतकरी आर्थिक सक्षम व्हावा यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. शेतीमालाला किफायतशीर भाव देणे, आयात निर्यात धोरणे व शुल्क याविषयी शेती गावगाडा आणि शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेणे, शेतीची अवजारे बी बियाणे, खत, कीडनाशके यांच्या किमतीवर नियंत्रण ठेवणे होय. या उपाययोजना अत्यंत सजगपणे अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे.

आर्थिक कणा मोडल्याने शेतकरी जगण्याची उमेद हरला व कोलमडून पडला. सभोवतीच्या विविध सामाजिक यंत्रणांनी व समाजाने त्याला वाळीत टाकले. शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या साऱ्या दमनकारी यंत्रणांना-व्यवस्थांना वठणीवर आणण्याचे कार्य करावे लागणार आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागचे समाजशास्त्र सरकारला समजून घ्यावे लागेल. स्वतंत्र भारताचा शेतकरी हा स्वतंत्र नागरिक आहे. तो माणूस आहे, गुलाम नाही. शेतकऱ्याच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, तांत्रिक, परिसरीय आदि विविध प्रश्नांकडे एकाच वेळी लक्ष देऊन, हे प्रश्न समजून घेऊन ते कायमस्वरूपी सोडवण्याची तरतूद करावी लागेल. शेतकऱ्याला निर्भयपणे, मुक्तपणे आणि मुख्य म्हणजे आर्थिक सक्षमतेने जगता येणे म्हणजे शेतकऱ्याला चिंतामुक्त करणे होय. या प्रक्रियेला काही वेळ लागेल. लोकप्रतिनिधींची इच्छाशक्ती हवी आणि समाजाची जागरुकता, सजगताही हवी. पण सध्याचे राजकीय वातावरण शेती- शेतकरी, शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये नैतिकता यांचा कैवार करणारे आहे का?




# जायकवाडी-मांदाडे अहवाल-खट्टा-मिट्ठा...!

**मेंढेगिरी समिती असो वा मांदाडे समिती नद्यांच्या पाण्याच्या नियमनांचा वाटपाचा विषय असो, संबंधित समित्यांमध्ये पर्यावरण तज्ज्ञांचाही समावेश असायला हवा.**

जायकवाडी धरणाच्या उर्ध्व बाजूकडे साठणाऱ्या पाण्याचे समन्यायी पद्धतीने वाटप सुचवण्यासाठी २०१३ मध्ये मेंढेगिरी समिती (अभ्यासगट एक) गठीत करण्यात आली होती. वास्तविक ही समिती ही जायकवाडी धरणाची संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन केलेली अल्पकालीन उपाययोजना होती. त्यानुसार अप्पर गोदावरी उपखोऱ्याच्या स्तरावर जलाशयांतील म्हणजे नाशिक-अहिल्यानगर जिल्ह्यातील लहान, मध्यम, मोठ्या जलाशयातील पाण्याचे असे नियमन करायचे की १५ ऑक्टोबर रोजी जायकवाडी जलाशयातील प्रत्यक्ष पाणी साठा एकूण साठ्याच्या ३३१% किंवा त्याहून अधिक होईल. म्हणजेच जायकवाडी धरण त्यायोगे ६५% भरेल. त्यानुसार सन २०१२ ते २०२४ पर्यंतच्या एकूण १३ वर्षात जायकवाडी धरणात समन्याची कायद्याच्या शिफारशीनुसार सहा वर्षात नाशिक-अहिल्यानगरच्या धरणातून खाली पाणी सोडण्यात आले. अन्य वर्षात जायकवाडीचा जिवंत साठा ६५% झाल्याने यात पाणी सोडावे लागले नाही. वर सांगितल्याप्रमाणे ही आपत्कालीन व्यवस्था होती. दर पाच वर्षांनी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीमध्ये या धोरणाचा आढावा घेण्याची शिफारस खुद मेंढेगिरी समितीने सुचवली होती. परंतु त्यानंतर दहा वषार्नंतर शासनाने जुलै २०२३ मध्ये मेरी (नाशिक) महासंचालक मांदाडे यांच्या अध्यक्षतेखाली (अभ्यास गट-२) स्थापना करण्यात आली त्याचा अहवाल १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सादर झाला. या अहवालातील ठळक बाब म्हणजे जायकवाडी धरणातील १५ ऑक्टोबर रोजीचा जिवंत पाणीसाठा ६५ टक्क्यावरून ५८% करण्यात आला आहे. हा पाणीसाठा जायकवाडी धरण लाभधारक व अहमदनगर नाशिक धरणाचे लाभधारक यांच्यातील तीव्र ते अतीव्र वादाचा मुद्दा होऊ शकतो. मात्र मांदाडे अहवालात मेंढेगिरी अहवालात नसलेल्या किंवा दुर्लक्षिलेल्या बऱ्याच मुद्यांचा समावेश केला आहे. विशेष म्हणजे धरणाच्या पाण्याच्या सांख्यिकी (स्टॅटिस्टिकल) आकड्यांऐवजी धरणाच्या पाण्याचा प्रत्यक्ष वापर गृहीत धरला आहे.

वास्तविक प्रत्यक्षात धरणाच्या पाण्याच्या संदर्भात अनेक घटक बदलते असतात. घरगुती वापर, औद्योगिक पाण्याचा वापर, नवीन सिंचन योजनांची निर्मिती हे चढ्या क्रमाने बदलणारे घटक आहेत. मांदाडे अहवालाने हे घटक लक्षात घेऊन म्हणजेच जायकवाडी धरणाच्या वरील धरणांचा वाढता पाण्याचा वापर विचारात घेऊन जनसामान्यांच्या सिंचनाच्या बाबत्या अपेक्षा विचारात घेऊन १५ ऑक्टोबरचा जायकवाडी चा पाणीसाठा ६५१% वरून ५८% टक्क्यांवर आणला आहे. त्यामुळे मांदाडे अहवाल पूर्वीच्या अहवालापेक्षा लवचिक आणि वस्तुनिष्ठ वाटतो आहे. उदाहरणार्थ मेंढेगिरी अहवालाने पाण्याचा विसर्ग वरील धरणांतून सप्टेंबर महिन्यात आणि १५ ऑक्टोबर पर्यंत करण्याचे सुचविले होते तर मांदाडे अहवाल म्हणतो की, अहिल्यानगर-नाशिकची धरणे जून ते सप्टेंबर या काळात मान्सूनवर अवलंबून असतात तर जायकवाडीमध्ये बहुतांश पाणी १५ सप्टेंबर ते ऑक्टोबर या काळात परतीच्या मान्सूनमुळे येते. त्यामुळे जर upstream धरणातून लवकरच पाणी सोडले तर म्हणजे सप्टेंबर पूर्वी सोडले तर ४स्त्र२३१ीं ची धरणे रिकामीच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे जलाशय परिचालन वेळापत्रकानुसार त्या पंधरवाड्यात आवश्यक पाणी उपलब्ध असेल तरच ग्रेट्सचे परिचालन शक्य आहे. अन्यथा जायकवाडी प्रकल्पाच्या upstream मधील जलाशयांमध्ये पाणी कमी पडण्याची शक्यता आहे.

मांदाडे अहवालात अनेक आदर्श वाटाव्यात अशा सूचना आहेत. उदा. पाणी वापरण्याची कार्यक्षमता वाढवण्यासाठी ठिबक आणि फवार सिंचन पद्धतीचा अवलंब यापुढे पाच वर्षांच्या आत अनिवार्य करावे व या गोदावरी उपखोऱ्याच्या गुरुत्वाकर्षण सिंचनाचे सूक्ष्म सिंचन प्रणालीत रूपांतर करण्यासाठी पायलट खोरे म्हणून विचार करण्यात यावा. यावरून एक आठवले अकोले तालुक्यात आढळा या लघु प्रकल्पाच्या लाभक्षेत्राचे अशाच सूक्ष्म सिंचन पद्धतीत रूपांतर करण्याची घोषणा पंधरा वर्षांपूर्वी पाटबंधारे खात्याने केली होती मात्र त्यामुळे आमच्या विहिरींना पाणी येणार नाही असे समजून क्षेत्रातील साऱ्या शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला. गुरुत्वाकर्षण सिंचन चालू ठेवले, त्यामुळे अशा आदर्शवत वाटाव्यात या सूचना पुढे वास्तवात न येण्याचीही भीती असते.

मेंढेगिरी अभ्यास गटाने जायकवाडी ६५% इतका जिवंत साठा करण्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे जायकवाडीच्या upstream धरणातून अनेकदा पाणी सोडले. मात्र



किती पाणी सोडले? विविध कारणांमुळे सोडलेल्या पाण्याचा किती अपव्यय झाला? नेमकी किती पाणी जायकवाडी धरणात पोहोचले? त्याचा संबंधित सिंचनाला किती लाभ झाला? याचा कुठलाच तपशील कोणालाच कधी समजला नाही. उलट 'आमच्या तोंडचे पाणी पळवले', अशीच भावना अहिल्यानगर-नाशिकच्या शेतकऱ्यांची झाली. पाणी सोडते वेळी अशा शेतकऱ्यांच्या मोठ्या रोशाला शासनाला सामोरे जावे लागले. आता वरून सोडलेले पाणी मोजण्यासाठी नाशिकच्या धरणांसाठी कमलपूर व अहमदनगरच्या धरणांसाठी मधमेश्वर येथे पाणी मापन यंत्र बसवण्याची केंद्र सरकारने सुचवले आहे.

जायकवाडीच्या लाभधारकांनी वरील धरणातून पाईपलाईनने पाणी आणण्याची मागणी केलेली होती. मात्र मांदाडे आयोगाने ही मागणी फेटाळली आहे. जायकवाडी धरणातील पाण्याचा मोठा हिस्सा बॅक वॉटर उपसा, बेकायदा औद्योगिक वापर, भांडवली वापर, मध्य उद्योग यांसाठी वापरला जाण्याची कायम चर्चा असते. त्या पाण्याच्या वापराचे कुठेही कागदावर मोजमाप नाही. मांदाडे अहवालानुसार आता अशा उपभोक्त्यांची संख्या नकाशावर दाखवली जाईल. प्रकल्प प्राधिकरण त्यांना दफ कोडच्या स्वरूपात काही कायमस्वरूपी अधिकृत ओळख देईल. जे त्यांच्या पंपिंग स्टेशनला जोडलेले असतील. ज्यात मंजूर क्षेत्र एच. पी मंजूर असल्याची माहिती असेल. यामुळे जायकवाडीचे अचूक पाणी मोजता येईल.

जायकवाडी प्रकल्पासह upstream प्रकल्पाचा गाळ अभ्यास आजपर्यंत झालेला नाही. त्यामुळे सर्वच धरणातील जिवंत पाणीसाठा मोजमाप पुरातन आहे. त्यामुळे ऊर्ध्व धरणातून जायकवाडीत पाणी सोडण्याचा आकडा हा कायम मोघम स्वरूपाचा राहत आला. मांदाडे अहवाल पाच वर्षात वरील सर्व धरणातील गाळ काढण्याचा प्रस्ताव ठेवतो आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठा अद्यावत होईल व जायकवाडीसाठी वरून पाणी सोडताना गाळाच्या अचूक परिणामाचा विचार केला जाईल.

जायकवाडी प्रकल्पातील तूट भरून काढण्यासाठी पाणी चळण योजना नदीजोड प्रकल्प करण्याची सूचना अहवाल करतो. त्या योगे वरच्या धरणावरील जायकवाडीचा लोड कमी होण्यास मदत होईल. अहवालात खटकणाऱ्या बाबीही आहेत. उदा. अहवालात १५.६. पान नंबर १३७ मध्ये असे आहे from १९८० to २०१८ eat in scene that the actual water use of upstream side projects is less than 115 tmc ie. approved water use. म्हणजे वरच्या बाजूला पाण्याचा वापर मंजूर क्षमतेपेक्षा (११५) टी.एम.सी) कमी आहे. असा हिशोब मांडला जात आहे. दुसरे असे की जायकवाडी धरणाची योजना वार्षिक बाष्पीभवनाची प्रमाण ६६४.८३ Mcum गृहीत धरून करण्यात आली होती. परंतु शासन निर्णय १२.०९.२०१८ नुसार बाष्पीभवनाचे प्रमाण ३२३.१० टूं४ निश्चित करण्यात आले आहे. असे असताना वरचा पाण्याचा वापर मंजुरीपेक्षा कमी व बाष्पीभवनाची तूटही कमी तरी CHAPTER 7 शिफारस 1,6 hence forth the new irrigation projects, surface storages/ water bodies should not be sanctioned in upper godavari basin असे आहे. म्हणजे आता यापुढे उर्ध्व जायकवाडी क्षेत्रात म्हणजे अहिल्यानगर-नाशिक क्षेत्रात रांजणभरही पाणी अडवण्यात येऊ शकणार नाही आणि तेही पाणी शिल्लक असताना. नाशिक-अहिल्यानगरच्या लोकांना न आवडणारी ही सूचना तीव्र असंतोषाचे कारण ठरू शकते. ऊर्ध्व जायकवाडीच्या लाभक्षेत्रातील बरीचशी जमीन मुरमाड आहे. त्या खाली लगेच बेसोल्ट खडक आहे. येथील विहिरींना खोलवर पाणी लागते. उलट जायकवाडी खालच्या गोदाकाठच्या विहिरींना लवकर व तुडुंब पाणी असते. तेथे पाण्याची काटकसर अपवादानेच केली जाते. धरणातील ६५१% पाण्याला कायदेशीर रित्या हक्कदार झाल्याने बिअर उद्योगाला भरमसाठ पाणी देऊन पाण्याच्या उधळपट्टीला आवर घातला गेलेला नाही. एकीकडे असे असताना मांदाडे आयोग मात्र ऊर्ध्व जायकवाडी उपखोऱ्यात सूक्ष्म सिंचनाचा आग्रह धरतो हे विसंगत वाटते.

मेंढेगिरी समिती असो वा मांदाडे समिती नद्यांच्या पाण्याच्या नियमनांचा वाटपाचा विषय असो, संबंधित समित्यांमध्ये पाटबंधारे खात्याच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा अंतर्भाव असतो ते ठीकच आहे! परंत हा विषय केवळ संख्याशास्त्राचा नसून त्यात पर्यावरण खात्याचाही संबंध आहे. त्यामुळे अशा अभ्यास गटांमध्ये पर्यावरण शास्त्राच्या तज्ञांचाही अंतर्भाव असायला हवा. नद्यांचे नियमन, पाणी वळवणे, नदीजोड आदी प्रकल्पांमध्ये पर्यावरण शास्त्राचीही भूमिका असते, याची दखल घ्यायला हवी आहे. पण तसे होत नाही. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे, तसेच ती नैसर्गिक साधन संपत्ती आहे. त्याचे केवळ सांख्यिकीय वाटप एकतर्फी वाटते. शिवाय जायकवाडीचे नेमके तांत्रिक व पर्यावरणीय स्थान काय हा कायम वादग्रस्त मुद्दा राहिला आहे. तो इतिहास काढायला नको. परंतु शेकडो मैल दूर असलेल्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर सहा हजार मिलिमीटरपेक्षा जास्त पडणाऱ्या पावसावर याची सारी भिस्त, जायकवाडीच्या तब्येतीसाठी विविध आयोगांची स्थापना आणि मग अहवाल येणार. खुद घाटमाथ्यावरचा माणूस मात्र उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरणार. अजून पिण्याच्या पाण्याचे समन्यायी वाटप झाली नाही तिथे सिंचनाच्या पाण्याचे हास्यस्पद वाटप हे करणार! मराठवाड्यापेक्षा ऊर्ध्वं गोदावरी खोऱ्या अनेक गावे कायम तीव्र दुष्काळग्रस्त आहेत. मराठवाडा दहा वषार्तून कमाल चार वेळा दुष्काळग्रस्त होतो. उपखोऱ्यात अशी शेकडो गावे आहेत जी शतकानुशतके दुष्काळग्रस्त आहेत. हे आयोग अशा गावांचा पाण्याचा हक्क सुरक्षित ठेवतात काय? ज्यांची विश्वासार्हता जायकवाडीपेक्षा कमी आहे, अशा धरणांना तरी हे आयोग नियमातून वगळतात काय? ऊर्ध्व व गोदावरी खोऱ्यातील ज्या धरणांना दारे नाहीत त्यांच्यातून अमुक इतक्या मापाचे पाणी कसे सोडणार? उदा. अकोले (अ.नगर) मधील आढळा किंवा भोजापूर सारखे मध्यम प्रकल्प. अशा वेळी अहवाल तितके पाणी प्रवरेवरील भंडारदरा, निळवंडे यांच्यातून सोडण्याचे आदेश देतो. हा न्याय कसा? कारण आढळा अथवा भोजापूर धरणांना त्यांचा स्वतंत्र कमांड आहे. अशा वेळी ज्यांना दारे नाहीत असे प्रकल्प एकूण हिशोबातूनच माफ करण्यात यावेत. म्हणजे विनाकारण त्या ढ्ढेत्र७ मध्ये अन्य गेट्स असलेल्या मध्यम प्रकल्पावर अनावश्यक बोजा लादला जाणार नाही. जायकवाडीला पाणी नेताना पाण्याची जी नासाडी होती ती नेमकी कुणाच्या माथ्यावर मारली जाते? जे पावसाळ्यात अतिवृष्टीचे तर उन्हाळ्यात पाणीटंचाई शिकार होतात त्या आदिवासींना वा आयोगात नेमके कुठे स्थान असते...??

थोड्याच दिवसात पुढील अंक सुरू होईल. मराठवाडा म्हणेल ६५% टक्के पेक्षा कमी घेणार नाही तर समोरचे अहिल्यानगर-नाशिकचे म्हणतील आम्ही काहीच देणार नाही. आपापल्या राजकारणाच्या पोळ्या भाजल्या जातील, अस्मितांचे अंगार फुलवतील, आणखीही काही करतील. यानिमित्ताने महाराष्ट्राचे थोर पाणी तज्ञ कॉम्रेड दत्ता देशमुख यांचे म्हणणे आठवते. ते असे, पडणाऱ्या पावसाचे एकूण पाणी / महाराष्ट्रातील माणसांची एकूण डोकी = पाण्याचे समन्यायी वाटप असे होईल याची प्रतीक्षा करूयात.

# हराभरा कबाब

**साहित्य :** २ मोठे कप भरून मटारचे दाणे, १ मोठा उकडलेला बटाटा, ब्रेड क्रम्बस, आमचूर पावडर, मीठ व थोडीशी साखर, २ ते ३ हिरव्या मिरच्या, आले व लसूण.

**कृती :** सगळ्यात पहिले कढईमध्ये तेल घेऊन त्यात मटारचे दाणे टाकले. त्यामध्ये थोडी हळद, मीठ, हिरवी मिरची, आले, लसूण, जिरे जाडसर वाटलेले टाकले. १० ते १५ सेकंद वाफवले. नंतर त्यात आमचूर पावडर आणि साखर टाकले व २ मिनिटे परतून घेतले. त्यानंतर हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर मिक्सरमध्ये जाडसर भरड काढली. मटारच्या जाडसर भरडमध्ये कुस्करलेला बटाटा ब्रेड क्रम्बस व तोडे चवीपुरते मीठ टाकले. मिश्रण एकत्र केल्यावर गोल टिक्की बनवून तळून घेतले.



# सोन्याने सजवा रेशमी केस




**फॅशनच्या** युगात भूतकाळातल्या गोष्टी आल्या तर त्यात काही नवल नाही. कारण राजा-महाराजांच्या काळात मोठ्या कलाकुसरतेने तयार करण्यात आलेले पेहराव, नक्षीदार दागिने आजच्या आधुनिक युगातील कारागिरांना आकर्षित करत असून, त्यात काही बदल करून एक वेगळी नक्षी तयार केली जाते व तीच बाजारात पुन्हा फॅशनच्या रूपाने येते. त्यापेक्षा वेगळी गोष्ट म्हणजे राजा-महाराजांच्या काळात सोन्याच्या मुलाम्याने केस सजवले जात होते. त्याच नक्षीकडे आजचे कारागीर आकर्षित झालेले दिसतात. फॅशन म्हणजे जुन्या नव्याचे मिश्रणच म्हणता येईल. काळानुसार फॅशनमध्ये बदल झाले आहेत. मात्र त्याच्यामागे भूतकाळ लपला आहे. नव्याने बाजारात असलेल्या हेअर ज्वेलरीवर त्याचा प्रभाव दिसतो. देवदास, जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, उमराव जान असे काही चित्रपट आहेत, की त्यात नायिकेच्या केसांवर अधिक भर दिलेला दिसतो. भारतीय मुघल साम्राज्यातील शैली त्यात वापरलेली दिसते. या दागिन्यांना सामान्य नागरिकांनी देखील पसंती दर्शवली आहे. घागरा, साडी, सलवार-कुर्ता किंवा शर्ट पॅण्टवर देखील हे दागिने परिधान केले जाऊ शकतात. या दागिन्यांमध्ये हिरे, मोती, माणिक यांचे वर्क केले जात असल्याने त्यांच्या वजनानुसार त्यांची किंमत ठरवली जाते. रेश्मी केसांकरिता तयार करण्यात येणारे दागिने शुद्ध सोन्यात केले जातात. मात्र कमी बजेटमध्ये चांदीच्या दागिन्यांवर सोन्याची पॉलिश करून ते खरेदी







## आल्याचा ज्यूस आरोग्यासाठी फायदेशीर



- आल्याच्या रसामुळे डायबेटिज कंट्रोल होण्यास मदत होते. यातील अँटी डायबेटिक गुणधर्मामुळे डायबेटिज नियंत्रित राहतो.
- पचनाचा त्रास असल्यास त्यावर आल्याचा रस उत्तम. आल्याच्या रसाने पचन नीट होते.
- कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी होण्यासाठी आल्याचा रस घेणे फायदेशीर.
- आल्याच्या रसाच्या सेवनाने मुरुमे कमी होतात.
- कफाचा त्रास असल्यास त्यावरही आल्याचा रस उत्तम. पावसात सर्दी-खोकल्याचा त्रास अधिक होतो. त्यामुळे पावसात आल्याचा रस नियमितपणे घेतल्यास सर्दी-खोकल्यापासून बचाव होऊ शकतो.

**पालकांमध्ये आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याची क्रेझ काही वर्षांपासून अनेक पटीने वाढली आहे. काही पालक आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याच्या बहाण्याने स्वत:ही स्वीमिंग शिकतात. अनेक तज्ज्ञ स्वीमिंगला एका खेळाव्यतिरिक्त व्यायामाचा एक उत्तम पर्याय मानतात. परंतु स्वीमिंग योग्यप्रकारे न केल्यास आरोग्यासाठी नुकसानकारकही ठरू शकते. इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयाचे डिपार्टमेंट ऑफ इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सलटेंट डॉ. राकेश गुप्ता यांनी याबाबत काही टिप्स दिल्या आहेत.**

# सावधान! मुलांना स्वीमिंग शिकवण्याआधी घ्या ही काळजी

### आरोग्य तपासणी

मुलांना स्वीमिंगच्या क्लासला पाठवण्याआधी डॉक्टरांकडून मुलाची तपासणी करून घ्या. त्वचेचे संक्रमण, डोळे, नाक, कान, घशाची तपासणी करून घ्या. स्वीमिंग पूलच्या पाण्यात क्लोरिनचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सर्व इंद्रियांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते.

जर मुलाचे वजन अधिक जास्त किंवा अधिक कमी असल्यास अशा मुलांना डॉक्टरांकडून काही सल्ले देण्यात येतात. त्यामुळे मुलांना स्वीमिंगला टाकण्याआधी डॉक्टरांचा जरूर सल्ला घ्या.

### स्वीमिंग पूलची स्वच्छता

स्वीमिंग पूलच्या स्वच्छतेवर लक्ष देणे गरजेचे असते. दररोज पूलमध्ये अनेक लोक येत असतात. अशावेळी एखाद्याला त्वचारोग किंवा अन्य काही रोग असल्याचा त्याचा आपल्या मुलालाही धोका होऊ शकतो. त्यामुळे रोज स्वीमिंग पूलचे पाणी बदलले जाते का, स्वच्छ केले जाते का याची चौकशी करा. अनेकदा स्वीमिंग पूल खुल्या जागी असतात. त्यावर छप्पर नसल्यास स्वीमिंग पूलमध्ये पडणाऱ्या धूळ, पावसाचे पाणी तसेच इतर कचऱ्यामुळे संक्रमण होण्याचा धोका असतो.

### लाईफगार्ड

सर्व स्वीमिंग पूलमध्ये लाईफगार्ड असणे गरजेचे आहे. काही वेळा एखाद्या साधारण पोहणाऱ्या व्यक्तीला लाईफगार्ड म्हणून उभे केले जाते. अशा व्यक्तीकडे आपत्कालीन परिस्थितीत वाचवण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण नसते. ज्यावेळी स्वीमिंगसाठी येणाऱ्यांची संख्या अधिक असते, त्यावेळी अधिक लाईफगार्ड असणे गरजेचे आहे.

### प्रथमोपचार सुविधा

सरकारी नियमांनुसार जलतरण तलावात प्रथमोपचार सुविधा आणि इतर सर्व प्राथमिक सुविधा असाव्या. या सुविधा स्वीमिंग पूलच्या जवळ असाव्यात. आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीला प्रथम प्राथमिक मदत कक्षात नेणे आवश्यक आहे आणि आवश्यकतेनुसार प्राथमिक मदत दिली गेली पाहिजे.

**प्रशिक्षण आणि प्रशिक्षक**

**पाण्यात उडी मारण्याआधी मुलांना अनुभवी कोचद्वारे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. मुलांना पोहण्याचे शिकवण्यावेळी सुरक्षा उपकरणांचा वापर होणे गरजेचे आहे. ग्लासेस, फ्लोटर्स, इयर प्लग, कॅप इत्यादींचा वापर करणे गरजेचे आहे. फ्लोटरमध्ये छोटासाही होल असल्यास त्याची वेळीच दुरुस्ती केली गेली पाहिजे. फ्लोटर्स योग्य नसल्यास पाण्यात मुलांचे संतुलन बिघडण्याचा धोका असतो.**

### डिहायड्रेशन

पाण्यात पोहत असतानाही शरीरात डिहायड्रेशन होत असते. जास्त घाम येतो. त्यामुळे पाणी सोबत ठेवणे गरजेचे आहे.



# उन्हाळ्यात एसी चालवण्याआधी हे काम न केल्यास विजेचे बिल येईल भरमसाट

उन्हाळा सुरू झाला आहे. अनेक घरांत २४ तास पंखे सुरू ठेवावे लागत आहेत. तुमच्या घरात जर एसी असेल तर तो चालवण्याआधी काही गोष्टी जाणून घ्या. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी काही खास टिप्स देत आहोत. ज्या तुमच्या वीज बचत करण्यास मदत करू शकतात. तुम्ही जर या टिप्सचा वापर न करता एसी चालवत असाल तर तुमचे वीज बिल जास्त येण्याची शक्यता आहे. नेहमी लोक गरमीत एसी ऑन करतात. परंतु असे करणे चुकीचे आहे. गरमीत एसी सुरू करण्याआधी काही गोष्टी जाणून घेणे खूप गरजेचे आहे. जाणून घ्या डिटेल्स.

**घरात एसी असणारे**

**अनेक लोक असे आहेत. जे वर्षभर एसी चालवत नाहीत. परंतु उन्हाळा सुरू झाला की, घरातील एसी अचानक सुरू करतात. परंतु त्याआधी काही गोष्टी जाणून घेत नाही. त्यामुळे महिन्याचे बिल जास्त येते.**



### एसी सर्व्हिस करणे आवश्यक

काही महिन्यापासून बंद पडलेला एसी अचानक तुम्ही जर उन्हाळ्यात सुरू करीत असाल तर काही गोष्टी जाणून घ्यायला हव्यात. एसीला सुरु करण्याआधी त्या एसीची सर्व्हिस करणे खूप आवश्यक आहे. असे केल्याने केवळ गरमीत थंड हवा मिळत नाही तर वेळोवेळी सर्व्हिसिंग केल्याने तुमच्या एसीची लाइफसुद्धा वाढते. जर तुम्ही विना सर्व्हिस एसी सुरू ठेवत असाल तर तुमची खोली एसीने थंड होईल, पण महिन्याला विजेचे बिल भरमसाट येऊ शकते.

### एसी गॅस संबंधी हे काम करणे आवश्यक

जितकी आवश्यक एसी सर्व्हिस आहे. तितकेच आवश्यक एअर कंडिशनरमधील गॅस चेक करणे आहे. उन्हाळा सुरू होण्याआधी विनागॅस चेक करता एसी सुरु केला तर होऊ शकते की, तासभर एसी चालवल्यानंतर तुम्हाला थंड एसी मिळणार नाही. कूलिंग कमी होऊ शकते. कारण कम्प्रेसरवर दबाव वाढतो. यामुळे तुमचा एसी खराब होऊ शकतो. तुम्हाला हा एसी दुरुस्त करण्यासाठी मोठी रक्कमसुद्धा मोजावी लागू शकते.

# वापरा नॅचरल टोनर

**चेहरा** ऑईली असेल तर घरगुती बनवलेल्या टोनरच्या सहाय्याने सुस्थितीत राखता येतो. तेलकट त्वचेसाठी काकडीपासून बनवलेले टोनर उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे टोमॅटोपासून बनवलेल्या टोनरच्या वापराने चेहऱ्याचा वर्ण उजळतो आणि मुरुमांची समस्या कमी होते. तुलसी टोनरही विशेष लाभकारक ठरते.

यासाठी तुळशीची पाने चुरडून उकळत्या पाण्यामध्ये सोडावीत. थंड झाल्यावर या पाण्यामध्ये एक चमचा कोरफडीचा गर मिसळावा. आता तयार मिश्रण बाटलीत भरून टोनरसारखे वापरावे, याच पद्धतीने मेथी घालून अथवा हळदीच्या सहाय्याने टोनर बनता येते. हळदीचे टोनर बनवताना एक चमचा लिंबाचा रस मिसळण्यास विसरू नये.



**एखाद्याच्या शारीरिक स्वास्थ्याचा अंदाज शरीराच्या सुदृढतेवरून लावला जातो. त्यामुळे बळकट आणि 'टोन्ड' स्नायू, उत्तम स्टॅमिना आणि अर्थातच न सुटलेले पोट यावरून एखाद्याच्या स्वास्थ्याचा अंदाज लावता येऊ शकतो. नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराने शरीर सुदृढ आणि सुडौल होत असतानाच पोटावर असलेली चरबी कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान ठरू शकते. पोटावर साठलेली चरबी कमी करण्यासाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये याबद्दल अनेक गैरसमजही पाहावयास मिळतात. हे गैरसमज कोणते आणि यामध्ये कितपत तथ्य आहे, हे जाणून घेऊ या.**



# पोटावरील चरबी कमी करण्यासाठी या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक

**व्यायामामध्ये** खास पोटावरील चरबी कमी करण्यासाठी केवळ 'क्रन्चेस' केल्याने चरबी कमी होते हा गैरसमज अनेकांच्या मनामध्ये असतो. क्रन्चेस हा व्यायाम प्रकार पोटावरील चरबी घटवण्यास सहाय्यक असला, तरी केवळ याच्यामुळे पोटाचा घेर कमी होतो असे मात्र नाही. क्रन्चेस करून पोटावरील चरबी कमी करतानाच, सर्व शरीरावरील चरबी कमी होईल अशा प्रकारचा व्यायाम केला जावा. त्यामुळे आपल्या व्यायामामध्ये 'स्ट्रेंग्थ ट्रेनिंग' आणि 'हाय इंटेन्सिटी कार्डियो'सारख्या व्यायाम प्रकारांचाही समावेश असावा.

कित्येकदा केवळ ग्रीन टीच्या सेवनाने पोटावरील चरबी घटण्यास मदत होत असल्याचा समजही अनेकांच्या मनामध्ये दिसून येतो. ग्रीन टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असल्याचे जरी खरे असले, तरी केवळ ग्रीन टी प्यायल्यानेच पोटावरील चरबी कमी होते असे समजणे चुकीचे आहे. पोटावरील चरबी कमी करण्यासाठी ग्रीन टीच्या जोडीनेच संतुलित, पौष्टिक आहार आणि योग्य व्यायामाचीही आवश्यकता असते. नियमित व्यायाम केल्याने आपल्या मनाला येईल ते आपण खाऊ-पिऊ शकतो अशी समजूत वजन आणि अर्थातच पोटावरील चरबी वाढण्यास कारणीभूत ठरत असते. योग्य आहार आणि नियमित व्यायाम हे एकमेकांना पूरक असून, यांच्यामधील योग्य संतुलन साधता आल्यानेच पोटावरील चरबी घटवता येणे शक्य होत असते.

बाजारामध्ये उपलब्ध असलेले तथाकथित 'लो फॅट', पॅकेज्ड अन्नपदार्थ वजन घटवण्यासाठी चांगला पर्याय असल्याचेही अनेक लोक मानतात. पण वास्तविक आहारामध्ये इतर सर्व पोषक तत्त्वांच्या सोबत स्निग्ध पदार्थदेखील आवश्यक असतात. त्यामुळे आहारातून शरीराला 'गुड फॅट्स' मिळतील असे अन्नपदार्थ आपल्या आहारामध्ये समाविष्ट असायला हवेत. शरीराला चांगले असे स्निग्ध पदार्थ आहारातून घेतले गेल्याने भूक लवकर शमण्यास मदत होत असते. त्यामुळे सातत्याने 'लो-फॅट' पदार्थांच्या सेवनाने शरीराला फायदा होण्याऐवजी नुकसान होण्याची शक्यताच जास्त असते. आपल्या आहारामध्ये तूप, चांगल्या प्रतीची खाद्यतेले यांचा समावेश अवश्य असावा. कमी खाल्ल्याने पोटावरील चरबी कमी होते असाही एक गैरसमज आढळून येत असतो. भोजन घेताना आपण किती खात आहोत याकडे लक्ष असणे अगत्याचे असले तरी आपली भूक मारणे किंवा नावापुरते काही तरी खाऊन अधिक काळ स्वतःला उपाशी ठेवणे याचे अपायच अधिक आहेत.

आपल्या शरीराला आवश्यक तितका आहार मिळाला नाही, तर शरीराची चयापचय शक्ती कमी होते आणि त्यामुळे वजन घटण्याची प्रक्रियाही मंदावते. त्यामुळे माफक आहाराद्वारे शरीराला आवश्यक इतकी कर्बोदके, प्रथिने, क्षार, जीवनसत्त्वे आणि अन्य पोषक तत्त्वे मिळतील याकडे लक्ष देणे गरजेचे असते. याकामी गरज भासल्यास आहारतज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा.

# गुणकारी दुधीभोपळा

**भोपळा ही अनेकांची नावडती भाजी, भरीत, कोशिंबीर, सूप असे पदार्थ भोपळ्यपासून बनवले जातात. कितीही नावडता असला तरी गुणधर्मामुळे थोड्या प्रमाणात का होईना, परंतु प्रत्येकाने भोपळा खायलाच हवा. चेहऱ्यावर पडणाऱ्या सुरकुत्यांपासून पोटाच्या गंभीर विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. भोपळ्याच्या अशाच काही औषधी गुणधर्माबाबत जाणून घेऊ.**

**भोपळ्यात 'बिटा करोटिन'**

- या घटकाचं प्रमाण बरंच जास्त असतं. यामुळे भोपळा हा 'अ' जीवनसत्त्वाचा समृद्ध स्त्रोत मानला गेलाय. बिटा केरोटिनमधील ऑटिऑक्सिडंट्समुळे शरीरातील फ्री रेडिकल्सचा सामना अगदी सहज करता येतो.
- भोपळा हे तापावरचं औषध आहे.
- भोपळ्यातील विशिष्ट्य प्रकारच्या खनिजांमुळे मेंदूच्या नसांना आराम मिळतो.
- हृदयरोग्यांसाठी भोपळा वरदान मानला जातो. भोपळ्यात कोलेस्ट्रॉल कमी करण्याची क्षमता असते.
- आतड्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही भोपळा गुणकारी मानला जातो. भोपळ्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते.
- बहुसंख्य महिलांमध्ये लोहाची कमतरता आढळते. अशा महिलांनी भोपळ्याच्या बियांचं सेवन करावं. भोपळ्याच्या बियांमध्ये लोह, झिंक, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम यांचे प्रमाण भरपूर असल्याने बरेच लाभ होतात.
- पोटाच्या विविध विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. यातील फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट स्वच्छ झाल्याने अनेक रोगांना दूर ठेवता येतं.



# नखे अशी सांभाळा

**आपल्या शरीरातील कोणताही अवयव मग तो छोटा असो वा मोठा जोपर्यंत स्वस्थ असतो आणि त्याच्या कार्यात कुठेही बाधा येत नसते तोपर्यंत शरीरात कोणत्याही व्याधी निर्माण होत नसतात. मात्र काही वेळा अगदी बारीकसारीक दुखणीही कमालीची वेदनादायक ठरतात. आपल्या बहुतेक सर्व कामामध्ये हाताची बोटे आपण वापरत असतो. अनेक वेळा या बोटांच्या नखांना इजा होतात आणि त्यात पाणी जाऊन पू होतो आणि मग बोटांना ठणका लागतो. त्यावेळी हे उपाय करून पाहावेत.**



**नख दुभंगणे, जिव्हाळे लागणे**

ज्या बोटाला हा विकार असेल त्या बोटाला घट्ट चिकटपट्टी बांधावी. हा विकार अगदी थोडक्या काळासाठी असतो व बरेच वेळा १-२ दिवसांतच बरा होतो.

**नखुरडे**

बऱ्याच वेळा नखुरडे झाल्याने बोटाला ठणका लागतो. यातही बोटाला चिकटपट्टी घट्ट बांधल्यास नखुरडे लवकर फुटते. दुसरा उपाय म्हणजे शेंदूर व अंड्याचा पांढरा बलक खलून लावल्याने आराम पडतो. शेंदूर हा अँटीसेप्टीक म्हणून काम करतो.



**नखे वेळच्या वेळी कापणे**

हाताच्या बोटांची तसेच पायाच्या बोटांची नखे वेळच्या वेळी कापणे, त्यात अडकलेली घाण वेळच्या वेळी काढणे हे एकंदर आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. वय वाढत जाईल तसा नखांचा कडकपणा वाढत जातो. वृद्ध वयात तर नखे कापणेही अवघड जाते. अशावेळी पाण्यात बोरीक पावडर टाकून पाय थोडा वेळ बुडवून ठेवावेत व मग नेलकटरच्या सहाय्याने नखे कापावीत. अंघोळ झाल्यानंतरही नखे गरम पाण्यामुळे मऊ पडलेली असतात. त्यावेळी ती काढावीत. तसेच नखे कापताना अगदी त्वचेजवळ कापू नयेत. त्यामुळे जिव्हाळे लागण्याचा संभव कमी होतो.

**लहान बाळाची नखे कापतानाही**

अगदी लहान बाळाची नखे कापतानाही बाळाची अंघोळ होऊन बाळ झोपले की मगच ती अलगद काढावीत.

# सौंदर्यप्रसाधनं ठेवा फ्रीजमध्ये

**फ्रीजमध्ये नाशवंत पदार्थ ठेवले जातात. मात्र केवळ नाशवंत खाद्यपदार्थच फ्रीजमध्ये ठेवावेत असं नाही. लवकर खराब होणारी काही सौंदर्यप्रसाधनंदेखील फ्रीजमध्ये ठेवता येतील. फ्रीजमध्ये थंड वातावरणात प्रसाधनांमध्ये बॅक्टेरिया उत्पन्न होण्याचा धोका कमी होतो. त्याबरोबर प्रसाधनाचा रंग आणि आकार सुरक्षित राहतो. अशी कोणती प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत, जाणून घेऊ**



- परफ्यूम नेहमी थंड आणि कोरड्या जागी ठेवायला पाहिजे म्हणूनच परफ्यूम ठेवण्यासाठी फ्रीज ही योग्य जागा आहे. या थंड वातावरणामुळे परफ्यूमचं शेल्फ लाईफ वाढतं.
- डोळ्याखालील काळी वर्तुळं घालवण्यासाठी आय क्रीम्स वापरली जातात. कोल्ड आय क्रीममुळे डोळ्याखालची सूज कमी होते त्याचप्रमाणे काळवंडलेपणा कमी होतो. आय क्रीम्स फ्रीजमध्ये ठेवावीत.
- उन्हाळ्यात लिपस्टिक विरघळते. मूळ आकार नाहीसा होतो. अशी विरघळलेली लिपस्टिक लावणं कठीण जातं. शिवाय उष्ण तापमानामुळे लिपस्टिकमधील रसायनांमध्ये बदल घडू शकतो. मूळ रंग हरवण्याचाही धोका असतो. हे सर्व टाळण्यासाठी उन्हाळ्यात लिपस्टिक फ्रीमध्ये ठेवावी.
- फेशियल मास्क ठेवण्यासाठीही फ्रीज ही उत्तम जागा आहे. बाहेरच्या तापमानात फेशियल मास्कमधील काही महत्त्वपूर्ण घटक नष्ट होऊ शकतात.
- सध्या ऑर्गेनिक मेकअपचा बोलबाला आहे. अत्यंत चांगले परिणाम मिळत असल्यामुळे ही प्रसाधनं महिलांच्या पसंतीत उतरत आहेत. मात्र ऑर्गेनिक किंवा होममेड प्रसाधनांमध्ये प्रिझर्व्हेटिव्ह नसतात. म्हणून ती लवकर खराब होतात. हे टाळण्यासाठी ऑर्गेनिक प्रसाधनं फ्रीजमध्ये स्टोअर करावीत.
- व्हिटॅमिन सी युक्त सर्व प्रसाधनं सक्रिय घटकांनी युक्त असतात. त्याचप्रमाणे प्रसाधनांमध्ये रेटिनॉल आणि पेप्टाईड असल्यास अधिक काळजी घ्यावी लागेल. उग्र तापमानात या रसायनांच्या संरचनेत बदल होऊ शकतो. म्हणूनच अशी प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत.

# राज ठाकरेंच्या भाषणातील महत्वाचे १० मुद्दे

## लाडकी बहिण योजना

### कर्जमाफी ते संतोष देशमुख हत्याप्रकरण



**मुंबई :** गुढी पाडव्यानिमित्त आयोजीत करण्यात आलेल्या मेळाव्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले. लाडकी बहिण योजना, कर्जमाफी, शेतकरी आत्महत्येसह औरंगजेबाची कबर या मुद्यांवर राज ठाकरे यांनी स्पष्टपणे भाष्य केलं. तसेच कुंभमेळा, धर्म, राजकारण, प्रदुषण या मुद्यावरुन देखील राज ठाकरे यांनी राज्यकर्त्यांवर टीका केली. पाहुयात राज ठाकरे यांच्या भाषणातील महत्वाचे १० मुद्दे.

**लाडकी बहिण योजना बंद होणार :** राज्य सरकारच्या महत्वकांक्षी लाडकी बहिण योजनेबाबत राज ठाकरे यांनी महत्वाचं वक्तव्य केलं आहे. महाराष्ट्र सरकारवर या योजनेमुळं ६३००० कोटींचं कर्ज होईल असे राज ठाकरे म्हणाले. ही योजना बंद होणार असल्याचे राज ठाकरे म्हणाले. कर्ज काढून दिवाळी करायली सांगितली कोणी? असे राज ठाकरे म्हणाले.

**संतोष देशमुख हत्याप्रकरणावर काय म्हणाले राज ठाकरे? :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर देखील राज ठाकरे यांनी भाष्य केले. त्यांची खूप घाणेरड्या पद्धतीनं हत्या केली आहे. तुमच्या नसा नसात एवढी क्रूरता भरली असेल तर मी जागा दाखवेन तिथे जा असेही राज ठाकरे म्हणाले. हे सगळं झालं कशातून? तिथे असणाऱ्या मिल, प्रकलापातून निघणारी राख, मी आजपासून एकलं होत राखेतून फिनिक्स पक्षी भरारी घेतो. बीडमध्ये राखेतून गुंड तयार होतात असे राज ठाकरे म्हणाले. विषय होता पैशाचा. संतोष देशमुख यांनी कंडण्यांना विरोध केला म्हणून हे झाल्याचे राज ठाकरे म्हणाले.

**कर्जमाफीच्या मुद्यावर काय म्हणाले राज ठाकरे :** निवडणुकीच्या आधी तुम्हाला सांगितलं होतं कर्जमाफी होणार. पण काल अजित पवार म्हणाले की ३० तारखेच्या आधी पैसे भरुन टाका. कर्जमाफी होणार नाही. म्हणजे निवडणुकीच्या तोंडावर तुम्ही वाटेल ते बोलणार आणि निवडणुका झाल्या की म्हणतात पैसे भरा असे राज ठाकरे म्हणाले. दिवसाला शेतकऱ्यांचा ७ आत्महत्या होत आहेत. त्याच्याकडे कोणीही लक्ष देत नाहीत. असंख्य मुलं मुली पुण्याकडे येत आहेत. आम्ही त्यांना जातीत अडकवलं आहे असे राज ठाकरे म्हणाले. रोजगार निर्माण होत नाही, त्याकडे लक्ष दिलं जात नाही.

**राज्याच्या राजकारण सर्वात जास्त आमदार, मंत्री आणि मुख्यमंत्री हे मराठा समाजाचे होते :** आजपर्यंत राज्याच्या राजकारण सर्वात जास्त आमदार, मंत्री आणि मुख्यमंत्री हे मराठा समाजाचे होते. मग मराठा समाजाला आरक्षण का मागावं लागतं? मग काय केलं आमदारांनी. मंत्र्यांनी आणि मुख्यमंत्र्यांनी असा सवाल राज ठाकरे यांनी केला. मराठा समाजाला आरक्षण मागावे लागत असेल तर एवढे आमदार मंत्री मुख्यमंत्री का निवडून दिले एसे राज ठाकरे म्हणाले. हे फक्त निवडणुकीसाठी मते घेण्यासाठी जातीचा वापर केला जातो असे राज ठाकरे म्हणाले.

**जातीपातीचे भेद गाडून मराठी म्हणून एक राहिलं पाहिजे :** निवडणुकीच्या तोंडावर आश्वासन दिली ती तुम्ही विचारलं पाहिजे असे राज ठाकरे म्हणाले. जातीपातीचे भेद गाडून मराठी एक म्हणून तुम्ही उभे राहिले पाहीजेत असे राज ठाकरे म्हणाले.

**औरंगजेब कबरीजवळ मोठा बोर्ड लावा :** औरंगजेबाच्या कबरीजवळ केलेली सजावट काढून टाका. तिथे फक्त कबर दिलसली पाहिजे. तिथे एक मोठा बोर्ड लावा. आम्हा मराठ्यांनी संपवायला आलेला औरंगजेब आम्ही इथं गाडला गेला. हा आमचा इतिहास असे राज ठाकरे म्हणाले. आम्ही कुणाला गाडलं हे जगाला कळू द्या, असे राज ठाकरे म्हणाले. तिकडे लहान लहान मुलांच्या ट्रीप गेल्या पाहिजे असे राज ठाकरे म्हणाले.

**धर्माच्या नावाखाली नद्या बरबाद :** नदी प्रदुषणाच्या मुद्यावर राज ठाकरेंनी भाष्य केलं. धर्माच्या नावाखाली आपण नद्या बरबाद करत असल्याचे राज ठाकरे म्हणाले. सर्वांना आपापला धर्म प्रिय असतो, पण यामध्ये सुधारणा केल्या पाहिजेत असे राज ठाकरे म्हणाले. धर्माच्या गोष्टी मला सांगू नये कोणी असेही ठाकरे म्हणाले. मुंबईत पाच नद्या होत्या त्यातील चार नद्या मारल्या गेल्या आहेत. सांडपणी झोपडपट्यांमधून मारल्या गेल्या. आता मिठी नदी उरली आहे असे राज ठाकरे म्हणाले.

**विद्युतदाहिन्या झाल्या पाहिजेत, जंगलतोड थांबली पाहिजे :** सगळीकडे झाडं जगवा झाडे लावा असे बोर्ड लावले जातात. मात्र, दुसरीकडे हिंदुचे अंत्यसंस्कार लाकडावर होतात. जंगलतोड झाल्याशिवाय लाकूड येणार नाही. याला पर्याय म्हणून विद्युतदाहिन्या आल्या आहेत. देशभर विद्युतदाहिन्या झाल्या पाहिजेत असेही राज ठाकरे म्हणाले. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी जंगलात गेले होते परदेशी माणसांबरोबर. पंतप्रधानांना जंगलांची आवड आहे. त्यांना प्राण्यांचीही आवड आहे. जंगले जगवली पाहिजेत असेही राज ठाकरे म्हणाले. संजय गांधी नॅशनल पार्क मुंबईत आहे ते जगात कुठेही नाही. पण सध्या सगळीकडे जंगलतोड सुरु आहे असे राज ठाकरे म्हणाले.

**प्रश्न पाण्याच्या स्थितीचा, कुंभमेळ्याचा अपमान नाही :** देशातील नद्यांची भीषण अवस्था आहे. ज्याला आपण माता म्हणतो देवी म्हणतो त्या नद्यांकडे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष आहे असे राज ठाकरे म्हणाले. गंगा साफ करा असे प्रथम राजीव गांधी म्हणाले होते. तेव्हापासून गंगा साफ होत होते. पंतप्रधान मोदींनी २०१४ साली तेच सांगितलं आहे. नद्यांची अवस्था बिकट आहे. कुंभमेळ्यात लाखो लोक अंघोळ केल्यानंतर आजारी पडले आहेत. प्रश्न पाण्याच्या स्थितीचा आहे. कुंभमेळ्याचा अपमान नाही असे राज ठाकरे म्हणाले. यावेळी राज ठाकरेंनी गंगेची स्थिती दाखवणार व्हिडीओ दाखवला. नैसर्गिक गोष्टीवर असा धर्म आडवा येत असेल तर काय करायंच त्या धमार्चं असा सवाल ठाकरेंनी केला.

**चित्रपटाने जागे होणारे हिंदू काही कामाचे नाहीत :** चित्रपटाने जागे होणारे हिंदू काही कामाचे नाहीत. विकी कौशल मेल्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान समजले काय? असा सवाल करत राज ठाकरे यांनी हल्लाबोल केला. सध्या माथी भडकवण्याचे काम सुरु आहे. इतिहासाच्या मुळाला गेला ना तुमच्या अपेक्षांची भांडी फुटतील असे राज ठाकरे म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज हा एक चमत्कार आहे. हा एक विचार आहे असे राज ठाकरे म्हणाले.

# धोकादायक ६००० वृक्षांच्या फांद्यांची छाटणी

## पावसाळ्यातील संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी पालिकेचा निर्णय

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये पावसाळ्याच्या कालावधीत धोकादायक वृक्ष उन्मळून पडण्याबरोबर वृक्षांच्या फांद्या पडून नागरिक जखमी होण्यासह वाहनांचे नुकसान होते. अशा दुर्घटना यंदाच्या पावसाळ्यात घडू नयेत यासाठी पावसाळ्याच्या दोन महिने आधीच शहरातील सहा हजार वृक्षांच्या धोकादायक फांद्या छाटण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना दिली. धोकादायक फांद्यांची योग्यप्रकारे छाटणी केल्यामुळे वृक्ष उन्मळून पडण्याच्या प्रकारांनाही आळा बसेल, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

ठाणे महापालिका क्षेत्रात सात लाखाहून अधिक वृक्ष आहेत. पावसाळ्यात हे वृक्ष उन्मळून पडण्याचे प्रकार घडतात. अशा घटनांमध्ये नागरिकांना आपला जीव गमवावा लागल्याचा प्रकार यापुर्वी समोर आला होता. याशिवाय, नागरिक जखमी होण्याबरोबरच वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. पावसाळ्यात विद्युत तारा आणि झाडांच्या फांद्यांचा संपर्क होऊन अपघात होण्याची शक्यता असते. अशा दुर्घटना टाळण्यासाठी यंदाच्या वर्षी पावसाळ्याच्या दोन महिने आधीच वृक्ष छाटणीच्या कामाला सुरूवात होणार असल्याची माहिती ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिली. ठाणे महापालिका क्षेत्रातील वृक्षांची पाहाणी पालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडून करण्यात आली होती. यानुसार, शहरातील रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणी, शाळा, रुग्णालये, उद्याने, चौक, बसथांबे आणि रहिवास परिसरात सहा हजार वृक्षांच्या फांद्या धोकादायक स्थिती असल्याचे आढळून आले असून या फांद्यांची पावसाळ्यापुर्वी छाटणी केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



**दिडशे धोकादायक वृक्ष**

ठाणे महापालिका क्षेत्रात करण्यात आलेल्या सर्वेक्षणादरम्यान, दिडशे वृक्ष धोकादायक स्थितीत आढळून आली आहेत. कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करून हे वृक्ष तोडण्यात येत आहेत. रस्त्यालगत असलेल्या वृक्षांभोवती काँक्रीटचे थर जमा झाले होते. त्यामुळे वृक्ष उन्मळून पडण्याचे प्रकार घडत होते. याबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर वृक्षांभोवती असलेले काँक्रीटचे थर काढून टाकण्यात आलेले आहेत, अशी माहीती उद्यान विभागाचे अधिकारी केदार पाटील यांनी दिली.

**नागरिक, लोकप्रतिनिधींना आवाहन**

ठाणे महापालिकेच्या प्रभाग समितीनिहाय उद्यान विभागांच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या असून त्यांच्याकडे झाडांच्या फांद्या छाटणीची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय, काही वेळेस काही धोकादायक वृक्ष पालिका प्रशासनाच्या निदर्शनास येत नाहीत. परंतु स्थानिक नागरिकांना आणि लोकप्रतिनिधींना मात्र त्याबाबत माहिती असते. यामुळे या वृक्ष छाटणीच्या कामासाठी स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधीकडे काही तक्रारी आणि सुचना असतील, तर त्यांनी त्या पालिका प्रशासनाकडे कराव्यात, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशावरून विकास म्हात्रेंच्या समर्थकांवर गुन्हा दाखल

**डोंबिवली :** चार वर्षापूर्वी डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा भागात रस्ता बंद करण्यावरून झालेल्या वादातून भाजपचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांनी आम्हाला शिवीगाळ करत दमदाटी केली. म्हात्रे यांच्या सांगण्यावरून त्यांच्या सात समर्थकांनी आमच्या घरात घुसून आम्हा कुटुंबीयांना शस्त्राचा धाक दाखवून दहशत निर्माण केली, अशी तक्रार कुंभारखाणपाडा येथील बाळकृष्ण रामचंद्र म्हात्रे यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात मंगळवारी दाखल केली आहे.

चार वर्षापूर्वी घडलेल्या या प्रकरणाची विष्णुनगर पोलिसांनी दखल न घेतल्याने बाळकृष्ण म्हात्रे यांनी राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली होती.




"यांप्रकरणात काही तथ्य नाही. पालिकेचे गणेशघाट विकासाचे काम सुरू होते. त्याठिकाणी असलेले खांबाचे अडथळे संबंधितांनी काढून टाकले होते. पालिका, पोलिसांनी संबंधितांना समज दिली होती. विकास कामात अडथळा आणण्याचे काम संबंधितांनी केले होते. आपला याप्रकरणाशी थेट संबंध नाही. पोलिसांच्या सर्व प्रकारच्या चौकशीला आपण सामोरे जाण्यास तयार आहोत. आयोगाच्या आदेशाला न्यायालयात आव्हान देणार आहोत."
**-विकास म्हात्रे, माजी नगरसेवक, डोंबिवली.**

याप्रकरणातील सबळ पुराव्यांच्या आधारे राज्य मानवी हक्क आयोगाने विष्णुनगर पोलिसांना बाळकृष्ण म्हात्रे यांच्या तक्रारीवरून माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांचे समर्थक प्रमोद चव्हाण उर्फ पम्या, अंगरक्षक नागेंद्र राय, मृत्युंजय राय, बंटी अनंता म्हात्रे, अजय निळकंठ गोलटकर, रवी माळी, अखिल निंबाळकर यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिले.

बाळकृष्ण म्हात्रे यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, कुंभारखाणपाडा, शिवाजीनगर नाना नानी पार्कच्या बाजुला आमच्या वडिलोपार्जित जमिनीकडे मुख्य रस्त्यावरून जाणारा पोहच रस्ता कल्याण डोंबिवली पालिकेच्या ठेकेदाराने लोखंडी अडथळे उभे करून चारवर्षा पूर्वी बंद केला होता. आम्ही मे २०२१ मध्ये हेमंत म्हात्रे, मयुर म्हात्रे, शिवराम म्हात्रे गणेशघाट येथे ठेकेदाराला रस्ता का बंद केला म्हणून विचारण्यासाठी गेलो होतो. ठेकेदाराने विकास म्हात्रे यांना मोबाईलवर संपर्क करून हेमंत म्हात्रे यांच्याशी बोलणे करून दिले. विकास म्हात्रे यांनी हेमंत यांना शिवीगाळ करत ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर ठेकेदाराने अंगरक्षक नागेंद्र राय यांच्या सांगण्यावरून काम सुरू केले होते.

या घटनेच्या दिवशी संध्याकाळी म्हात्रे यांचे सात समर्थक आमच्या घरी रिवॉल्व्हर, सुरे, चाकू घेऊन आले. त्यांनी विकास म्हात्रे यांच्याशी पंगा घेताय का, असे प्रश्न करून घरात दहशत निर्माण केली. मयुर म्हात्रेचा समाचार घ्यायचा आहे, असे बोलून ते निघून गेले होते. याप्रकरणी आम्ही विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी गेलो. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला नाही, असे बाळकृष्ण म्हात्रे यांनी तक्रारीत म्हटले आहे. पोलीस ठाण्यातून घरी परतल्यावर पुन्हा म्हात्रे यांचे समर्थक आमच्या घराजवळ बसले होते. आम्ही पोलिसांना संपर्क केल्यावर ते निघून गेले, असे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली होती. आयोगाने पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

# गुढीपाडव्याच्या दिवशी गृह खरेदीला पसंती

**ठाणे :** साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला मुहूर्त म्हणजे गुढीपाडव्याचा सण आहे. यादिवशी दागिने, वस्तू, वाहन, गृह खरेदी करण्यास नागरिक पसंती देतात. या शुभ मुहूर्तावर ठाणेकरांनी यंदा गृह खरेदीला पसंती दिल्याचे दिसून येत आहे. ठाणे शहरातील एक हजाराहून अधिक नागरिकांनी गुढीपाडव्याच्या दिवशी नविन घरांचा ताबा घेतला. तर, ५०० हून अधिक घरांची विक्री झाल्याची माहिती क्रेडाई एमसीएचआयच्या वतीने देण्यात आली.

हिंदू दिनदर्शिकेनुसार वर्षभरात साडेतीन शुभ मुहूर्त असतात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, दसरा आणि दिवाळीचा पाडवा हे साडेतीन मुहूर्त आहेत. या दिवशी मौल्यवान



वस्तूंची खरेदी करणे म्हणजे शुभ मानले जाते. विशेष करुन यादिवशी अनेकजण दागिने, गृह आणि वाहन खरेदी करण्यास प्राधान्य देताना दिसून येतात. यंदाही गुढीपाडव्यानिमित्त ठाणे शहरातील सराफाच्या दुकानात तसेच वाहनांच्या दुकानात ग्राहकांची खरेदीसाठी सकाळ पासून गर्दी दिसून आली.

तर, या शुभ मूहूर्तावर गृह खरेदीस देखील नागरिकांनी सर्वाधिक पसंती दिसल्याचे दिसून आले. क्रेडाई एमसीएचआय या संस्थेकडून आलेल्या अहवालानुसार गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर एक हजारहून अधिक कुटूंबांनी त्यांच्या हक्काच्या घरांचा ताबा घेतला आहे.

तर, क्रेडाई एमसीएचआय ठाणे सदस्यांच्या मार्फत ५०० हून अधिक घरांची विक्री केल्याची माहिती क्रेडाई एमसीएचआय ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी दिली. घोडबंदर, पोखरण दोन आणि ठाणे शहरातील गृह प्रकल्पांमधील ही घरे असल्याचेही त्यांनी सांगितले.

# चार पिस्तुलांसह १२ काडतुसे जप्त

**पुणे :** रांजणगाव परिसरातील सराइताकडून पुणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने देशी बनावटीच्या चार पिस्तुलांसह १२ काडतुसे, तीन मॅगझिन असा शस्त्रसाठा जप्त केला. सूरज राजेश पाडळे (वय २७, रा. सोनसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. पाडळे आणि त्याचा साथीदार संकेत संतोष महामुनी (रा. सरदवाडी, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी मध्य प्रदेशातून देशी बनावटीची चार पिस्तुले, काडतुसे खरेदी केली होती. महामुनी आणि त्याच्याबरोबर असलेल्या तीन साथीदारांनी पिस्तुले पाडळे याच्याकडे ठेवायला दिली होती. पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला याबाबतची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करुन सोनसांगवी गावातून पाडळेला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चार पिस्तुले, १२ काडतुसे, तीन मॅगझीन अशा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. पाडळे आणि महामुनी हे सराइत गुन्हेगार आहेत. त्यांच्याविरुद्ध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. गेल्या तीन महिन्यात ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने सराइतांकडून सात पिस्तुले आणि १७ काडतुसे जप्त केली आहेत. ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, सहायक निरीक्षक दत्ताजीराव मोहिते, तुषार पंदारे, जनार्दन शेळकरे, संजय जाधव, राजू मोमीन, अमोल शेडगे यांनी ही कारवाई केली.

# बाळाच्या काळजीने आईचे काळीज का कठोर झाले?

## पोटावर विळ्याचे ६५ चटके, अखेर देवदूत म्हणून डॉक्टर पुढे आले...

**अमरावती :** हृदयाच्या दुर्धर आजाराने ग्रस्त असणाऱ्या २२ दिवसांच्या चिमुकल्याला अंधश्रद्धेतून त्याच्या आईने चक्क पोटावर चटके दिल्याचा प्रकार उघडकीस आला होता. आता याच चिमुकल्यावर नागपुरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु झाले असून त्याच्या हृदयावर जटील शस्त्रक्रिया करुन या बाळाचा जीव वाचवण्यात डॉक्टरांना यश आले आहे. या मुलाच्या हृदयावर शस्त्रक्रिया करण्यासाठी अमरावतीचे पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला असून त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश येऊन या चिमुकल्याला अखेर नवीन जीवन मिळाले आहे.

अवघ्या २२ दिवसांच्या चिमुकल्याला अंधश्रद्धेतून त्याच्या आईने चक्क पोटावर चटके दिल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर या चिमुकल्याच्या आई-वडिलांवर गुन्हा दाखल झाल्याचे समजताच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासन आणि पोलिसांना सूचना देत रुग्णालयात या मुलाला उपचारासाठी पाठवण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर या बाळावर डॉक्टरांना शर्तीचे प्रयत्न करीत त्याच्या जीव वाचवण्यात यश आले.

**बाळ दूध सुद्धा प्यायला लागलं**



पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना ही बाब कळताच त्यांनी मुलाला उपचारासाठी नागपुरातील नेल्सन या खाजगी रुग्णालयात पाठवले. बाळाची प्रकृती गंभीर असताना छातीत इन्फेक्शन झाल्यामुळे त्याच्यावर उपचार करणे कठीण होते. सुरुवातीला त्याच्या छातीत झालेले संक्रमण कमी करण्यासाठी डॉक्टराच्या टीमने १० दिवस उपचार केले. त्यानंतर बळाच्या हृदयावर जटील अशी शस्त्रक्रिया करण्यात आली.त्यानंतर दहा दिवस लोटले असून बाळ आता बरं झालेले आहे. आता हे बाळ दूध सुद्धा प्यायला लागलं आहे. येत्या दोन ते तीन दिवसात त्याला डिस्चार्ज होणार असल्याचं सुद्धा डॉक्टरकडून सांगण्यात आले.

**श्वास घ्यायला त्रास होत होता**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट या दुर्गम आदिवासी भागामधील सिमोरी गावात 22 दिवसाच्या बाळाला सातत्याने श्वास घ्यायला त्रास होत असल्यानं ते सारखे रडत होते. त्या बाळाच्या आईने अंधश्रद्धेपोटी विळ्याने या नाजुक कोवळ्या बाळाला 65 चटके दिल्याची बाब उघडकीस आली. अंधश्रद्धेतून केलेल्या प्रकारामुळे पालकांवरच चिखलदरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर ह्या बाळाला अमरावती येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. त्यानंतर त्याला नागपूरातील खाजगी रुग्णालयात ऑपरेशनसाठी नेण्यात आले.

# खंडणीसाठी अपहरण झालेल्या बालकाची शहापूरमधून सुटका

**डोंबिवली :** डोंबिवली जवळील रिजन्सी अनंतम गृहसंकुलात राहत असलेल्या कोमल महेश भोईर यांच्या सात वर्षाच्या बालकाची शुक्रवारी सकाळी शाळेत जात असताना दोन कोटी रूपयांच्या खंडणीसाठी अपहरण करण्यात आले होते. मानपाडा पोलिसांनी तत्पर तपास करून मोठ्या कौशल्याने शहापूर जवळून अपहृत बालकाची सुटका केली. याप्रकरणात चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यात दोन अल्पवयीन मुलांचा सहभाग आहे.

या बालकाला शाळेत सोडणाऱ्या वीरेन पाटील (२५) या रिक्षा चालकाने आपल्या साथीदारांच्या मदतीने हे कृत्य केल्याचे तपासात उघड झाले. मुलाचे वडील महेश भोईर विकासक आहेत. या मुलाचे अपहरण करून त्याला जीवे ठार मारण्याची धमकी भोईर कुटुंबीयांना दिली तर आपणास दोन कोटी रुपए सहज मिळतील असा विचार करून अपहरणकर्त्यांनी या बालकाचे



अपहरण केले होते, असे पोलीस तपासात पुढे आले आहे.

शुक्रवारी सकाळी साडे सात वाजता कोमल महेश भोईर यांचा मुलगा रिक्षेने शाळेत जाण्यासाठी निघाला. कोमल भोईर यांना अपहरणकर्त्यांनी दोन कोटी रुपये द्या, अन्यथा मुलाला ठार मारू, अशी धमकी त्यांच्या संपर्क क्रमांकावर दिली. मुलाचे अपहरण झाल्याचे समजताच हादरलेल्या भोईर यांनी तात्काळ मानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने याने घडला प्रकार सांगितला. हे प्रकरण नाजूक असल्याने उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे कादबाने यांनी पोलिसांची पाच तपास पथके तयार करून वेगळ्या दिशांना त्यांना पाठविले.

मुलाला शाळेत सोडणारा वीरने पाटील याने हे कृत्य केल्याचा संशय घेऊन पोलिसांनी त्या दिशेने तपास सुरू केला. तांत्रिक माहितीच्या आधारे वीरेनचा माग पथकांनी काढला. तो मुंबई नाशिक महामार्गावरील शहापूर परिसरात असल्याचे पोलिसांना समजले. पोलिसांच्या पथकांनी शहापूर भागात वीरेनचे ठिकाण शोधून त्याला बालकासह ताब्यात घेतले. मुलाच्या जीवाला धोका म्हणून पोलिसांनी या प्रकरणात अतिशय सावधगिरी बाळगली होती. मुलाचे वडील विकासक आहेत. आपल्याला दोन कोटी रुपए सहज मिळतील, असा विचार रिक्षा चालक वीरेन पाटीलने केला होता. त्याचा डाव पोलिसांनी साडे तीन तासाच्या आत उधळला.

बालकाला पोलिसांनी सुखुरूपपणे अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सोडवून त्याचा ताबा पालकांना दिला. याप्रकरणात पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले आहे. एक रिक्षा, एक चाकू जप्त करण्यात आला आहे. त्यांच्या विरुध्द खंडणी, अपहरणाचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, साहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र चोपडे, संपत फडोळ, अभिजीत पाटील, स्वाती जगताप, हवालदार सुनील पवार, राजेंद्र खिल्लारे, बाबा जाधव, संजू मसाळ, शिरीष पाटील, विकास माळी, सचिन साळवी, सुशांत पाटील यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com